रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌ आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-21 (31-12-2022) ॥ वर्ष ८५ ॥ अंक २५३ ॥ पृष्ठे ८ www.krushival.in





# कृषीवल

किंमत ४ ₹

रायगड ॥ शनिवार, दिनांक १९ फेब्रुवारी २०२२


## जिल्ह्यात ५१ रुग्ण; एका रुग्णाचा मृत्यू

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

जिल्ह्यात शुक्रवार दि. १८ फेब्रुवारी रोजी कोरोनाच्या ५१ नव्या रुग्णांची नोंद झाली असून उपचारादरम्यान एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे. चार तालुक्यात आज एकही नवीन रुग्णाची नोंद झालेली नाही. तर दिवसभरात १०६ रुग्ण कोरोनामुक्त झाले अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली. शुक्रवारी पनवेल महापालिका हद्दीत १७, पनवेल ग्रामीण ४, उरण २, खालापूर २, पेण ७, अलिबाग ८, मुरुड १, माणगाव २, रोहा ४, श्रीवर्धन १, महाड २ तर पोलादपूर १ असे ५१ रुग्ण आढळले.

# शिवसेना / भाजप कार्यकर्ते आमनेसामने

महेंद्र खैरे

। रेवदंडा ।

*सत्तेसाठी, सत्तेपोटी सरपंच सांगतो, बंगले आहेत, पुन्हा तेच दोन तासांनी बंगले नाही असे सांगतो, दोन तासाच्या अवधीत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी बंगले गायब केले काय? असा सवाल करून खरे काय, खोटे काय यांच्या तपासाची मागणी करत मिसेस मुख्यमंत्री रश्मी ठाकरे यांना न्याय मिळवून देणार असे ठोस प्रतिपादन रेवदंडा पोलीस ठाणे येथे माजी खा. किरीट सोमय्या यांनी केले. दरम्यान सोमय्या कोर्लई ग्रामपंचायतीमध्ये येत असल्याने भाजप कार्यकर्त्यांनी ठिकठिकाणी भाजपचे झेंडे लावून वातावरण निर्मिती केली. तर शिवसेनेचे बहुसंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते यांची मोठ्या संख्येने उपस्थिती ठेवून आक्रमक भूमिका घेतली. जर सोमय्या यांनी नाहक बदनामी केल्यास शिवसेना जशास तसे उत्तर देईल असा इशारा उपस्थित कार्यकर्त्यांनी दिला. त्यामुळे तणाव निर्माण झाला होता. मात्र पोलिसांच्या हस्तक्षेपामुळे अनुचित प्रकार टळला.*



**॥ मुख्यमंत्र्यांविरोधात सोमय्या आक्रमक**

**॥ मिसेस मुख्यमंत्र्यांचे १९ बंगले हरवले :सोमय्या**

**॥ पोलिसांच्या हस्तक्षेपाने शांतता**

तत्पुर्वी सोमय्या हे कोर्लई ग्रामपंचायत व रेवदंडा पोलीस ठाणे येथे येणार असल्याचे जाहीर केल्याने कोर्लई ग्रामपंचायत परिसरात पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त केला होता. मुरूड तालुक्यात कोर्लई येथील रश्मी ठाकरे व मनिषा वायकर यांच्या नावे साडेनऊ एकर जमीन आहे. या जमिनीवर १९ बंगले असल्याचा आरोप सोमय्या यांनी केला आहे. मात्र या जागेवर बंगलेच नाही, असे शिवसेना खा. संजय राऊत यांनी सांगितले होते. पान २ वर

## सोमय्यांचे मुख्यमंत्र्यांना आव्हान

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

कोर्लईतील रश्मी ठाकरेंच्या १९ बंगल्यांचे गुढ वाढत चालले आहे. येथील ५ कोटी १९ लाखांचे बंगले अदृश्य झाले असून, हे बंगले मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी तर रात्री येऊन अदृश्य केले नाहीत ना? अशी शंका भाजप नेते किरीट सोमय्या यांनी शुक्रवारी (दि.१८) अलिबागमध्ये उपस्थित केली. तसेच १९ बंगल्यांबाबत उपलब्ध असलेली कागदपत्रे खोटी असल्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सिद्ध करावे, असे आव्हान त्यांनी दिले.

**कोर्लईतील १९ बंगल्याचे पुरावे खोटे असल्याचे सिध्द करून दाखवा**

कोर्लई ग्रामपंचायतीचे सरपंच प्रशांत मिसाळ यांनी दोन दिवसांपूर्वी गावातील रश्मी ठाकरे यांच्या जागेत कोणतेही बंगले नसल्याचे स्पष्ट केले होते. त्यानंतर या जागेवरील १९ बंगले गेले कुठे? या प्रकरणाची चौकशी करावी? अशी भूमिका घेत किरीट सोमय्या यांनी शुक्रवारी कोर्लई ग्रामपंचायत, रेवदंडा पोलीस ठाणे तसेच जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. पान २ वर

> **संजय राऊत हे माझ्यावर आरोप करीत आहेत. मात्र पुरेसे पुरावे देत नाहीत. ते केवळ रोज सकाळी जनतेचे मनोरंजन करण्याचे काम करीत आहेत. त्यांनी केलेल्या कोव्हिड केअर सेंटर घोटाळ्यावरुन लक्ष वळविण्यासाठी माझ्यावर आरोप करण्याचा सपाटा लावला आहे. आम्ही जे आरोप करतो ते पुराव्यानिशी करतो.**
> **- किरीट सोमय्या**

पोलीस महासंचालकपदी

## रजनीश शेठ यांची नियुक्ती

। मुंबई । वृत्तसंस्था ।



राज्याला अखेर पूर्णवेळ पोलीस महासंचालक मिळाले आहेत. रजनीश शेठ यांची राज्याच्या पोलीस महासंचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. संजय पांडे यांच्याकडे या पदाचा अतिरिक्त कार्यभार होता. यावरून उच्च न्यायालयानेही सरकारवर ताशेरे ओढले होते. त्यामुळे अखेर सरकारकडून रजनीश शेठ यांची पोलीस महासंचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ते १९८८ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी आहेत. आझाद मैदान दंगलीच्या वेळी शेठ हे मुंबईचे कायदा आणि सुव्यस्था विभागाचे सहपोलीस आयुक्त होते.

**म ह त्वा चे**

### इंद्राणीच्या अर्जावर ३ मार्चला सुनावणी

**मुंबई :** राज्यातील प्रचंड गाजलेल्या शीना बोरा



हत्याकांडातील मुख्य आरोपी हिने इंद्राणी मुखर्जी हिने शीना बोरा ही जिवंत असल्याचा दावा केला होता. यासंदर्भात इंद्राणीने सीबीआयच्या विशेष कोर्टात याचिका दाखल केली होती. सीबीआयने आरोपी इंद्राणी मुखर्जीच्या अर्जावर उत्तर दाखल करण्यासाठी विशेष सीबीआय न्यायालयाकडे १४ दिवसांचा अवधी मागितला होता.

### आंगणेवाडीची यात्रा २४ फेब्रुवारीला

**सिंधुदुर्ग :** प्रसिद्ध आंगणेवाडी भराडी देवीची यात्रा कोव्हिड नियमांचे पालन करून होणार आहे. यासंदर्भात नियोजन झाले आहे. दोन डोस घेतलेल्यांनाच दर्शनासाठी प्रवेश दिला जाणार आहे, अशी माहिती पालकमंत्री उदय सामंत यांनी दिली. आंगणेवाडी देवस्थानचे अध्यक्ष भास्कर आंगणे यांनी, यात्रोत्सवाच्या नियोजनासंदर्भात बैठक झाली. भाविकांना अगदी सुलभतेने दर्शन घेता येईल, अशी व्यवस्था केली जाईल. गेल्या वर्षी मर्यादित स्वरूपात उत्सव साजरा करण्यात आला होता.

कोरोनाने मृतांच्या वारसांचे अनुदानासाठी

## ४ हजार ५९५ अर्ज

। अलिबाग । भारत रांजणकर ।

**३ हजार ४४२ पात्र तर ५४४ अपात्र**

कोरोनामुळे उपचारादरम्यान रायगड जिल्ह्यात ४ हजार ६८९ जणांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. शासनाने जाहीर केलेल्या मृतांच्या नातेवाईकांना मिळणाऱ्या अनुदानासाठी कोरोनाने मृत झालेल्या ४ हजार ५९५ वारसांनी अनुदानासाठी अर्ज केले आहेत. त्यापैकी ३ हजार ४४२ अर्ज पात्र ठरले आहेत तर ५४४ अपात्र अर्जदारांना मदत नाकारण्यात आली आहे. त्याचप्रमाणे १८१ अर्ज त्रुटींमुळे प्रलंबित असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

जिल्ह्यामध्ये कोरोनाचा मोठा उद्रेक झाला होता. आतापर्यंत २ लाख १४ हजार २३६ जणांना कोरोनाचा संसर्ग झाला. त्यापैकी आतापर्यंत ४ हजार ६८९ रुग्णांचा जीव गेला आहे. तर २ लाख ९ हजार २६ जणांनी कोरोनावर यशस्वीपणे मात केली. मृतांच्या कुटुंबीयांनी ५० हजारांच्या सानुग्रह अनुदानासाठी अर्ज पान २ वर

अहमदाबाद बॉम्बस्फोट प्रकरणी

## ३८ जणांना फाशी

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

अहमदाबादमध्ये जुलै २००८ मध्ये झालेल्या बॉम्बस्फोट मालिकेप्रकरणी ३८ जणांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. तर ११ जणांना जन्मठेप सुनावली गेली आहे. अहमदाबादच्या विशेष कोर्टाने हा निकाल दिला आहे. तब्बल १४ वर्षांनी न्याय मिळाला आहे. या प्रकरणाची संवेदनशीलता लक्षात घेऊन कोर्टाच्या परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला



**११ जणांना आजन्म कारावास**

आहे. या बॉम्बस्फोटप्रकरणी कोर्टाने ४९ आरोपींना दोषी ठरवले होती. त्यांच्या शिक्षेसाठी १८ फेब्रुवारीची तारीख निश्चित केली होती. अहमदाबादच्या विविध भागांमध्ये २००८ ला बॉम्बस्फोट घडवण्यात आले होते. विशेष न्यायाधीश ए. आर. पटेल यांच्या कोर्टाने १८ फेब्रुवारी ही निकालाची तारीख निश्चित केली होती. या प्रकरणी कोर्टाने निकाल दिला. २६ जुलै २००८ ला अहमदाबाद बॉम्बस्फोटांच्या मालिकांनी हादरले होते. या प्रकरणी U-P- (अनलॉफुल ॲक्टिव्हिटीज प्रिव्हेन्शन ॲक्ट) अंतर्गत ७८ पैकी ४९ आरोपींना दोषी ठरवण्यात आले होते.

## कुपोषणाला करणार रायडातून हद्दपार

। पनवेल । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातून कुपोषणाला हद्दपार करण्याचा निर्धार जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी केला असून, कुपोषित बालकांना पोषण आहाराचे वाटप करण्यात आले. कातकरी उत्थान अभियानांर्गत हा उपक्रम हाती घेण्यात आला असून, त्याचा प्रारंभ पनवेल तालुक्यातील सुकारपूर येथून करण्यात आला. पनवेल तहसील आणि अन्नदा स्वयंसेवी संस्थेच्या पान २ वर



**॥ जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांचा निर्धार**

**॥ पनवेलमध्ये कुपोषित बालकांना पोषण आहाराचे वाटप**

## राज्यात बर्ड फ्ल्यूचा शिरकाव



। ठाणे । वृत्तसंस्था ।

राज्यातील कोरोनाचे संकट दूर होत असतानाच, आता नवे संकट उभे ठाकले आहे. महाराष्ट्राची राजधानी मुंबईच्या वेशीवरील ठाणे जिल्ह्यात बर्ड फ्ल्यूने शिरकाव केला आहे. शहापूर तालुक्यातील एका पोल्ट्रीतील शेकडो कोंबड्या बर्ड फ्ल्यूने दगावल्या आहेत. कोंबड्यांचा मृत्यू हा बर्ड फ्ल्यूच्या संसर्गाने झाल्याचे तपासणी अहवालात स्पष्ट झाले आहे. यानंतर खबरदारीचा उपाय म्हणून पोल्ट्रीपासून एक किलोमीटर परिसरातील जवळपास २५ हजारांहून अधिक कोंबड्यांची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात येणार आहे. पान २ वर

**ठाण्यातील शेकडो कोंबड्या दगावल्या**

### रायगडचा पशूसंवर्धन विभाग सज्ज

*ठाणे जिल्ह्यातील शहापूरमध्ये बर्ड फ्ल्यूचा शिरकाव झाल्यानंतर रायगड जिल्ह्यात सतर्कता बाळगत जिल्हा परिषदेच्या पशूसंवर्धन विभाग सज्ज झाला असल्याचे पशूसंवर्धन अधिकारी डॉ. श्याम कदम यांनी म्हटले आहे. रायगड जिल्ह्यातील संपूर्ण पशूसंवर्धन टिमला सतर्क करण्यात आले आहे. कुठेही बर्ड फ्ल्यू सदृश्य प्रश्न उद्भवला, कुठे काही मरतूक जाणवली तर आपण ताबडतोब नमुने तपासणीला पाठवून त्यासंदर्भात निर्णय घेतले जातील. रायगड जिल्ह्याची शिघ्र निर्णय समिती देखील तयार केली आहे. कुठेही जरा देखील बर्ड फ्ल्यूचा प्रादुर्भाव आढळला तर पशूसंवर्धन टिम सज्ज असल्याचे जिल्हा परिषदेचे पशूसंवर्धन अधिकारी डॉ. श्याम कदम यांनी सांगितले.*

## भारताच्या प्रगतीत मुंबईचे मोठे योगदान

**पंतप्रधान नरेंद्र मोदींचे प्रतिपादन; ठाणे-दिवा मार्गिकेचे उद्घाटन**

। मुंबई । वृत्तसंस्था ।

मुंबईत २१व्या शतकातील पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर आमचे विशेष लक्ष असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे नरेंद्र मोदी यांनी ठाणे ते दिवा यांना जोडणाऱ्या दोन अतिरिक्त रेल्वे (पाचवी आणि सहावी) लाईन्सचे उद्घाटन केले. तसेच मुंबई उपनगरीय रेल्वेच्या दोन उपनगरीय लोकलला देखील हिरवा झेंडा दाखवला. या प्रसंगी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि



राज्यपाल भगतसिंग कोश्यारी सुद्धा ऑनलाईन उपस्थित होते.

स्वतंत्र भारताच्या प्रगतीत मुंबईचे मोठे योगदान आहे. आता आत्मनिर्भर भारत निर्माण करण्यासाठी मुंबईची क्षमता अनेक पटींनी वाढवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या नव्या सुविधांचा लाभ मुंबई आणि आसपासच्या शहरांना होणार असल्याचे यावेळी नरेंद्र मोदी म्हणाले. याप्रसंगी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी केंद्राचे आभार मानले. मोदीजींचे नेहमी सहकार्य महाराष्ट्राला लाभले आहे आणि कायम लाभेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

ठाणे आणि दिवा यांना जोडणारे दोन अतिरिक्त रेल्वे मार्ग सुमारे ६२० कोटी रुपये खर्चून बांधण्यात आले असून, यात १.४ पान २ वर

## तरुणीचा विनयभंग

**जिल्हाधिकारी कार्यालयात चर्चा**

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग शहरातील समाधान हॉटेल शेजारील श्रीराम गार्डन बिल्डिंगमधील मयुर महाडिक याने २४ वर्षीय तरुणीचा विनयभंग केल्याची घटना गुरुवारी घडली. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात त्याच्या विरोधात ३५४ कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पान २ वर

## आज रायगडात होणार शिवगर्जना

### मूर्त्या व रॅलीच्या आयोजनासह ढोलताशेही सज्ज

। सायली पाटील । अलिबाग ।

***शिवजयंती आली,***
***पुन्हा शिवगर्जना होणार,***
***ढोलताशांच्या गजरात,***
***आमचे स्वराज्यधीश येणार.***

*मराठ्यांचा मराठमोळा सण म्हणजे शिवजयंती. महाराष्ट्राच्या मातीत जन्मल्याचा सार्थ अभिमान वाटणाऱ्या प्रत्येकाच्याच अंगात रोमांच भरतो, ज्यांच नाव, चित्र आणि चरित्र जरी डोळ्यासमोर आलं तरी अंगातील रक्त*



*सळसळतं, अशा शून्यातून स्वराज्याचा डोलारा उभारणाऱ्या, अवघ्या महाराष्ट्रावरच नव्हे तर भारताबाहेरही प्रत्येकाच्या मनामनावर आणि स्वराज्याच्या कणकणवर अधिराज्य गाजवणाऱ्या प्रत्येकाच्याच मनात राजे म्हणून अग्रस्थानी असणाऱ्या* पान २ वर

### मावळा प्रतिष्ठान अलिबागतर्फे मिरवणूक सोहळा

***कोरोनामुळे सगळ्याच सणांवर निर्बंध लागले होते. पण आता ते शिथील झाले असून शिवजयंती निमित्त सालाबादप्रमाणे मावळा प्रतिष्ठान अलिबागने मिरवणूक सोहळा आयोजित केला आहे. ही मिरवणूक संपूर्ण अलिबागमध्ये फिरविली जाणार असून घोड्याच्या रथावर शिवबा आणि त्यांच्यासमवेत मावळे तसेच ढोलताशापथक असणार आहे. जास्त धामधूम न करता अतिशय साध्या पद्धतीने शिवजयंती साजरी करणार आहे.***

> **कोरोनामुळे अगदी हातातोंडाशी आलेला घास जसा हिरवला जावा तसेच दरवेळेला वादन करता येणार असल्याची बातमी कानावर यायची आणि पुन्हा वादनाला पूर्णविराम द्यावा लागत होता. पण आता शिवजयंतीला ढोलताशा पुन्हा एकदा घुमणार असल्याने मनाला मोठा दिलासा मिळाला आहे.**
> **- अभिषेक नाईक, कुलाबा ढोलताशा पथक, वादक**




**अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१९ फेब्रुवारी**

१) श्रीम. विनोदिनी तेंडुलकर
१९-०२-१९४८
अलिबाग

**म | ह | त्वा | चे**

## आठ जणांना जन्मठेप

**। लातूर । वृत्तसंस्था ।**

केवळ ५०० रुपयांसाठी एका तरुणास अत्यंत निर्दयीपणे हाल करुन ठार केल्याची चार वर्षापूर्वी लातूर शहरात घडली होती. घटनेच्या ४ वर्षानंतर याबाबत लातूर जिल्हा व सत्र न्यायालयाने याप्रकरणातील सर्वच्या सर्व आठ आरोपींना जन्मठेपीची शिक्षा सुनावली आहे. यामध्ये सात पुरुष आणि एका महिलेचा समावेश आहे. शादुल शेख रा. अंजलीनगर या तरुणाचा शहरातीलच टाऊन हॉल मैदानावर आईस गोळ्याचा गाडा होता. एप्रिल २०१८ मध्ये गाडा लावला असताना आरोपींनी त्याला ५०० रुपायांची मागणी केली होती पण शादुल ही रक्कम देण्यास विरोध दर्शवला होता. याचाच राग मनात धरुन आरोपींनी त्यास मारहाण केली होती. यामध्ये त्याचे हाल करुन अत्यंत निर्दयीपणे त्याची हत्या करण्यात आली होती. याप्रकरणी तब्बल आठ जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. कोर्टाचे हे आदेश येताच आरोपींच्या नातेवाईकांनी आक्रोश केला होता.

# ‘संघर्ष’कडून शिवस्मारकाचा कायापालट

## श्रमदान, पदरमोड करून स्वच्छता व सुशोभिकरण

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

येथील शिवाजी महाराज स्मारकाचा ‘एक संघर्ष समाजसेवेसाठी’ या ग्रुपमधील सदस्यांनी कायापालट केला आहे. प्रत्यक्ष श्रमदान व पदरमोड करून येथे गेल्या आठवडाभरापासून स्वच्छता व सुशोभिकरण मोहीम राबविली. या मोहिमेत पालीतील नागरिक हिरिरीने सहभागी झाले आणि शिवस्मारकाचा कायापालट केला.

शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर शिवस्मारकाचा कायापालट करावा, तेथे साफसफाई व दुरुस्ती करावी यासाठी एक संघर्ष समाजसेवेसाठी य ग्रुपवर साद घातली गेली. आणि, जातपात, धर्म विसरुन अगदी लहानग्यांसह मोठे देखील हातात झाडू, फावडे, कुदळ, कोयता, झाड छाटण्याची कैची आदी साधन सामग्री घेऊन कंबर कसून कामाला लागले. हे सर्व दिवसभर आपला कामधंदा व नोकरी सांभाळून रात्री स्मारकात श्रमदानासाठी जमत होते. संपूर्ण स्मारक आणि आजूबाजूचा परिसर चकाचक करण्यात आला आहे.

**स्मारकासाठी पदरमोड**

**सर्वांनीच आपापल्या परीने पैसे स्वरुपात मदत केलीच. तर, काहींनी स्मारकाच्या कंपाऊंडसाठी जाळी, लाद्या व लोखंडी पाईप दिल्या. काहींनी वाळू, सिमेंट, माती व झाडे दिली, कौल दिले, रंग पुरविला, बाकडे दिले. या बरोबर काहींनी कुठलीही मजुरी न घेता रंगकामासाठी, वेल्डिंगसाठी पुढाकार घेतला आहे. सुशोभीकरण केले आहे.**



**सारे काही समाजसेवेसाठी**

**एक संघर्ष समाजसेवेसाठी या ग्रुपमध्ये पालीतील होतकरु व सामाजिक जाण असलेले सुज्ञ तरूण व नागरिक सहभागी झाले. अशा प्रकारे सोशल मीडियाचा प्रभावी व विधायक वापर करुन शहराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी एकत्र आले आहेत. त्यांना सर्वच स्तरातून पाठिंबा व सहकार्य मिळत आहे.**

# नेरळ येथे अघोरी कृत्याचा कळस

## विहिरीत सापडले फुटके मडके, हाडे, मांस आणि उर्दू भाषेतील पुस्तक

**। नेरळ । वार्ताहर ।**

नेरळ पोलीस ठाणे हद्दीत येत असलेल्या ममदापूर ग्रामपंचायत येथे एका विहिरीत फुटके मडके, हाडे, मांस आणि उर्दू भाषेतील पुस्तक सापडून आल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे. तर, कोणी अघोरी विद्या तर केली नाही ना, असा ग्रामस्थांचा संशयदेखील बळावला आहे. याबाबत आता नेरळ पोलीस ठाण्यात माहिती देण्यात आली आहे.



नेरळ पोलीस ठाणे हद्दीतील ममदापुर ग्रामपंचायत येथे गावाबाहेर पिण्याच्या पाण्यासाठी असलेल्या विहिरत दि. १५ फेब्रुवारी रोजी दुपारी तीनच्या सुमारास एक बुरखा घालून आलेल्या महिलेने भरलेली बॅग ही विहिरीत टाकून दिली. आणि, ती महिला घाई गडबडीतच तिथून पळ काढत एका मोटारसायकलवरून गेली. याबाबत ग्रामस्थांनी नेरळ पोलिसांना याबाबत माहिती दिली होती.

यावेळी विहिरीत टाकण्यात आलेल्या बॅगेला विहिरीतील पाणी खाली करून बाहेर काढण्यात आले. त्यावेळी खूप दुर्गंधी सुटली होती तर, यात उर्दू भाषेत लिहिलेले एक फुटके मडके, त्याचबरोबर एक तीन सुळ्यासारखे एकत्र हाड व मांस, त्याचबरोबर उर्दू भाषेतील पुस्तक सापडून आले आहे. एक धक्कादायक म्हणजे, यात एका चिठ्ठीवर लहान मुलाच्या आकाराचे चित्र दिसत असून, उर्दू भाषेत लिहिलेलं आहे. एकूणच गावात ही पहिलीच घटना समोर आल्याने शहरात एकाच खळबळ उडाली आहे.

# नवीन पनवेल कोमसापच्या अध्यक्षपदी गणेश कोळी

**। पनवेल । वार्ताहर ।**

नवीन पनवेल कोकण मराठी साहित्य परिषदेच्या अध्यक्षपदी गणेश कोळी यांची निवड झाली आहे. नवीन पनवेलच्या के.आ. बांठीया विद्यालयात प्रा.चंद्रकांत मढवी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत २०२१ ते २०२४ या कालावधीकरिता नवीन कार्यकारिणी सर्वानुमते निवडण्यात आली.



यामध्ये उपाध्यक्ष रामदास गायधने, सचिव योगिनी वैदू, सहसचिव प्रा.अजिनाथ गाडेकर, खजिनदार गणेश म्हात्रे, कार्यकारणी सदस्य सुमंत नलावडे, चित्रलेखा जाधव, संतोष सुतार, मंदाकिनी हांडे, विजय पवार, जिल्हा प्रतिनिधी स्मिता गांधी, युवाशक्ती प्रमुख अमोल म्हात्रे, सल्लागार ॲड. प्रा. चंद्रकांत मढवी, ज्योत्स्ना राजपूत यांची निवड करण्यात आली.

**पान १ वरून**

## शिवसेना-भाजप कार्यकर्ते आमनेसामने

कोर्लई सरपंच प्रशांत मिसाळ यांनी देखील या जागेत बंगले नसल्याचा बाबीला दुजोरा दिला. यावर सोमय्या यांनी १९ बंगल्यांचा टॅक्स भरला असल्याने हे बंगले चोरीला गेले का? असा सवाल उपस्थित केला आहे. दरम्यान भाजप व शिवसेना कार्यकर्ते आमने सामने येऊन घोषणाबाजी करू लागले. भाजप व शिवसेना कार्यकर्त्यामध्ये जोरदार बाचाबाची होऊ लागली. दरम्यान भाजप कार्यकर्त्याना ग्रामपंचायतीच्या आवारातून हटवावे अशी मागणी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी धरली. महिला पदाधिकारी समोर येऊन धक्काबुक्की सुरू झाली. पोलीसांना खाक्या दाखवित, परिस्थिती आटोक्यात आणली. मात्र शिवसेना व भाजप कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणांनी कोर्लई ग्रामपंचायत परिसर दुमदूमला होता. काही मिनिटात भाजप नेते कोर्लई ग्रामपंचायत सरपंच व ग्रामसेवक यांची भेट घेवून ग्रामपंचायतीतून बाहेर पडून, तेथून ते रेवदंडा पोलीस ठाण्यात पोहचले. रेवदंडा पोलीस ठाण्यातून तब्बल वीस मिनिटांनी ते बाहेर आले.

## सोमय्यांचे मुख्यमंत्र्यांना आव्हान

यांनतर त्यांनी पत्रकारांसोबत संवाद साधला. यावेळी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना १९ बंगल्यांबाबंत माझ्याकडे असलेली कागदपत्रे खोटी आहेत हे सिद्ध करून दाखवावे असे खुले आव्हान दिले. रश्मी ठाकरे यांच्या जागेत १९ बंगले होते. या बंगल्याचा टॅक्स त्यांनी भरला आहे. मात्र अत्ता हे बंगले अदृश्य झाले आहेत. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी तर रात्री येऊन हे बंगले उडविले नाहीत ना? असा प्रश्न सोमय्या यांनी उपस्थित केला. जिल्हाधिकारी म्हणतात कागदावरुन बंगले हटविण्याचा अधिकार आम्हाला व राज्य सरकारला आहे. हा अधिकार त्यांना कुणी दिला? मात्र येथे बंगले असल्याबाबतची आमच्याकडे कागदपत्रे आहेत असे किरीट सोमय्या यांनी स्पष्ट केले.

## ४ हजार ५९५ अर्ज

करावे असे आवाहन प्रशासनाने केले होते. त्यानंतर यासाठी आतापर्यंत ४ हजार ५९५ अर्ज प्राप्त झाले आहेत. तर यातील ३ हजार ४४२ अर्ज बरोबर असून पात्र आहेत. तर ५४४ अर्ज वेगवेगळ्या कारणाने नाकारले आहेत. तसेच १८१ अर्ज प्रलंबित असून त्यात आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यात आल्यानंतर त्यांना अनुदान दिले जाणार आहे. जिल्ह्यातील पनवेल महानगरपालिकेत २ हजार ३५० रुग्णांचा कोरोनामुळे मृत्यू झाला आहे. त्यापैकी १ हजार ८३१ मृतांच्या वारसांना अनुदान मंजुर करण्यात आले असून २४५ जणांचे अर्ज नाकारण्यात आले आहेत. तर ९० अर्ज प्रलंबित आहेत. पनवेल मनपा वगळता जिल्ह्यात इतर तालुक्यात २ हजार २४५ रुग्णांचा कोरोनामुळे मृत्यू झाला. त्यापैकी १ हजार ६१८ जणांना अनुदान मंजुर करण्यात आले असून २९० जणांचे अर्ज नाकारण्यात आले आहेत. तर ९१ अर्ज प्रलंबित आहेत.

## तरुणीचा विनयभंग

तर ही बाब त्याच्या घरी सांगण्यासाठी गेलेल्या पिडितेला मयुरच्या पत्नीने धमकावल्याने त्यांच्याविरोधातही तक्रार दाखल करण्यात आली आहे. या घटनेची चर्चा जिल्हाधिकारी कार्यालयासह अन्य शासकिय कार्यालयात सुरु असल्याचे समोर आले आहे. दिलेल्या तक्रारीनूसार, अलिबागमध्ये मेडिकल कॉलेजमध्ये तृतीय वर्षाचे शिक्षण घेत असलेली पिडित मुलगी मयुर महाडिक राहत असलेल्या बिल्डिंगमध्येच राहत असून गुरुवारी (दि.१०) त्याने बिल्डिंगच्या जिन्यामध्ये तिच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. तिचे आई-वडील नवी मुंबईत राहत असून ती मैत्रिणीसमवेत शिक्षणानिमित्त अलिबागमध्ये राहते. त्याचाच फायदा घेत त्यांनी पिडितेसोबत गैरव्यवहार केला. पिडित मुलीने दिलेल्या तक्रारीत दोन वर्षापूर्वी मैत्रिणीमुळे मयुर महाडिक याच्यासोबत ओळख झाल्याचे तिने सांगितले. तसेच गुरुवारी मित्राच्या घराची चावी देण्यासाठी ती बिल्डिंगच्या खाली गेली होती. यावेळी परत घरी येत असताना जिन्यामध्ये मयुरने तिच्यासोबत गैरव्यवहार केला. त्यामुळे घाबरलेल्या पिडितेने झाला प्रकार मैत्रिणीला सांगितला. त्यानूसार जाब विचारण्यासाठी तसेच आरोपीच्या पत्नीला सांगण्यासाठी त्या आरोपीच्या घरी गेल्या. त्यावेळी पत्नीने ही बाब कोणासही न सांगण्यास सांगितले. तसेच त्यांची बाजू न ऐकता आरोपीच्या पत्नीने मुलींना धमकावले. आमचे खुप नातेवाईक अलिबागमध्ये राहतात. ते सर्व डेंजर आहेत. ते लगेच इथे येतील, अशी धमकी दिली. त्यामुळे पिडित मुलीने तिच्या आई-वडिलांना याबाबत कळविले. दरम्यान, आई-वडिलांनी अलिबागला येऊन आरोपीविरोधात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## भारताच्या प्रगतीत मुंबईचे मोठे योगदान

किमी लांबीचा रेल्वे उड्डाणपूल, ३ मोठे पूल, २१ छोटे पूल यांचा समावेश आहे. या मार्गांमुळे मुंबईतील उपनगरीय रेल्वेच्या वाहतुकीतील लांब पल्ल्याच्या गाड्यांच्या वाहतुकीचा अडथळा दूर होणार असून, या मार्गांमुळे शहरात ३६ नवीन उपनगरीय गाड्या सुरू करता येणार आहेत

## कुपोषणाला करणार रायडातून हद्दपार

माध्यमातून कुपोषित व कमी वजनाच्या बालकांना पोषण पोटलीचे वाटप करण्यात आले. पोषण पोटलीमध्ये सुक्ष्म मिश्रीत मकई, सोया, व गहू यांचे लाडू, डाळ, सोया व मल्टिग्रेन खिचडी व चिवडा चिक्की, भाजलेले चणे, राजगिरा, खजूर रोल, चित्रकला पुस्तके, कलर फेस मास्क या सर्व वस्तूंचा सामावेश करण्यात आला आहे.कार्यक्रमाला अन्नदा संस्थेचे संजय मिश्रा, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी घरत, तलाठी जोशी, ग्रामविकास अधिकारी सुदिन पाटील, पर्यवेक्षिका तांडेल व गांधी उपस्थित होत्या.

## राज्यात बर्ड फ्लूचा शिरकाव

एएनआयच्या वृत्तानुसार, ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात वेहळोली गावात एका पोल्ट्री फार्ममधील १०० हून अधिक कोंबड्या मृत्युमुखी पडल्या. अचानक हा प्रकार घडला. बर्ड फ्लूची भीती असल्याने कोंबड्यांचे नमुने तपासणीसाठी पुण्यातील प्रयोगशाळेत पाठवण्यात आले होते, अशी माहिती जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांनी दिली. याबाबत ठाणे जिल्हा प्रशासनाने खबरदारी घेण्याच्या सूचना जिल्हा पशुसंवर्धन विभागाला देण्यात आल्या. मृत कोंबड्यांचे नमुने तपासणीसाठी पुण्यातील प्रयोगशाळेत पाठवण्यात आले. याबाबत ठाणे जिल्हा परिषद प्रशासनाकडून सांगण्यात आले की, कोंबड्यांचा मृत्यू हा एच ५ एन१ ने झाल्याचे निष्पन्न झाले आहे. याबाबत केंद्रीय मंत्रालयालाही माहिती देण्यात आल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## आज रायगडात होणार शिवगर्जना

*राजांचा जन्मदिवस म्हणजे शिवजयंती. आणि याच शिवजयंतीची तयारी सर्वत्र सुरू झाली असून अलिबाग तालुक्यातही अतिशय जल्लोषात शिवजयंती सोहळ्याची लगबग सुरू आहे.बाजारातील शिवबांच्या मूर्त्यांना मागणी मूळचे राजस्थानचे असणारे व पुण्यात राहणारे काठियालाल भाटी, अमितकुमार भाटी हे दोन भाऊ व त्यांची आई इंद्रा सोलंकी यांनी अलिबाग येथे शिवबांच्या मूर्त्यांचे छोटेसे दुकान टाकले असून ते स्वत: पीओपीच्या मूर्त्या बनवतात व बॉम्बे कलर वापरून त्या मूर्त्यांचे रंगकामही करतात. ते पुण्यातील स्थायिक असल्याने तिथेच मूर्त्या बनवून सुरूवातीला ४०० मूर्त्या विकण्यासाठी अलिबागेत घेऊन आले. त्यातील जवळपास २०० मूर्त्या विकल्या गेल्या असून अलिबागमध्ये येण्याची ही पहिलीच वेळ असतानादेखील अलिबागकरांकडून मोठ्या प्रमाणात सुंदर असा प्रतिसाद मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.*

*रात्री १२ वाजताच्या शिवाजी पुतळा येथील मानवंदनेची तयारी कार्यक्रम?*

*सालाबादप्रमाणे अलिबागमधील शिवाजी चौक येथे १८ फेब्रुवरीच्या रात्री १२ वाजता शिवजयंतीच्या निमित्ताने सजावट करून शिवाजी महाराजांना मानवंदना दिली जाणार आहे. यावेळी अलिबागकर शिवाजी चौक येथील शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या परिसरात सजावट करून रोशनाई करतात. तर, मानवंदनाच्या रात्रीच्या कार्यक्रमासाठी अलिबागकर मोठ्या संख्येत उपस्थित असतात.*

*कुलाबा ढोल ताशा पथक सज्ज*

*महाराष्ट्राच्या मराठमोळ्या सणांची शान म्हणजे ढोलताशा. आणि शिवजयंती म्हणजे अवघ्या महाराष्ट्रासाठीचा सर्वात मोठा सणच. त्यात राज्य सरकारने शिवजयंतीसाठीच्या ढोल-ताशाला दिलेल्या परवानगीमुळे ढोलताशा पथकांमध्ये आनंद पसरलेला दिसत आहे. तसेच ढोलताशा पथकांचा वादनाचा सरावदेखील सुरू झाला आहे. अलिबागमधील कुलाबा ढोलताशा पथकांनी सराव सुरू केला असून शिवजयंतीच्या वादनासाठी ते सज्ज झाले आहेत.*

**पनवेल महानगरपालिका, पनवेल**

ई-निविदा सूचना क्रःपमपा/सा.बां.(भु.ग.)/३४२२/प्र.क्र.०१/०४२/२०२२ दिनांक : १४/०२/२०२२

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा क्र. | कामाची अंदाजपत्रकीय | इसारा रक्कम रूपये | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल शहारातील पटेल मोहल्ला परिसरातील जुन्या भुमिगत मलनिःसारण वाहिन्या ठिकाणी नवीन वाहिन्या टाकणे व त्या अनुषंगाने येणारे इतर कामे करणे. | PMC/PWD (UGD)/19/ 2021-22 | ४,२८,२५,५९४/- | २,१५,०००/- | १८ महिने (पावसाळा सोडून) |

या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या ‘http://mahatenders.gov.in’ या संकेतस्थळावर दिनांक २१/०२/२०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
**तृप्ती सांडभोर- I,**
अतिरिक्त आयुक्त
पनवेल महानगरपालिका,पनवेल

**RAIGAD DEVELOPMENT AUTHORITY**
**OFFICE OF THE MEMBER SECRETARY CUM CO LLECTOR, RAIGAD,MAHARASHTRA**

Raigad Development Authority (RDA) invites Expression of interest (Eol) from the experienced firms/Joint Ventures /Associations for the appointment as **“MASTER PLANNER for Raigad Fort & Prescient 21 villages”** as a part of the requirement, eligibility conditions and method of selection ets. are available on the website of Government of Maharashtra at www.mahapwd.com & www.mahatenders.gov.in Collector and Member Secretary, Raigad Development Authority. Raigad - Alibaug reserves right to accept or reject the offer.
Hard cupy of the uploaded documents has to submitted in the office of “The District Collector and Member Secretary, Raigad Development Authority, Raigad - Alibaug.”
**Tender ID-2022_PWR_768622_1**

**Time Schedule**

| Sr. No. | Stage | Start Date | Start time | Expiry Date | Expiry Time |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Period of Downloading & Online Submission of of bid documents. | 18-02-2022 | 10.00 | 15-03-2022 | 18.00 |
| 2. | Submission of hard copy of the uploaded documents | Upto 21-03-2022 18.00 | | | |
| 3. | Online opening of Technical bid in the Office of the Executive Engineer, Road Project DiviSion, Mahad (Special Cell Raigad Fort). | 22-03-2022 | 11:00 | | |
| 4. | Online opening of financial bid in the Office of the Executive Engineer, Road Project Division, Mahad (Special Cell Raigad Fort). | Will Provide (online) Separately after Opening of the Technical Bid | | | |

**Cost of Tender Form : Rs. 1,120/-**
**Earnest Money Rupees : Rs. 1,50,000/- only**
Please refer website for details
No. R.F.Sp.Cell/RPD/Mahad/EOI/44
Date- 14-02-2022

**Sd/-**
**(Dr. Mahendra Kalyankar, IAS)**
**Collector, Raigad**

**Bandhan Bank** | रीजनल ऑफिसः नेताजी मार्ग, मिठाकली सिक्स रस्त्यांजवळ, एलिसब्रीज, अहमदाबाद-06. फोनः +91-79-26421671-75

**प्रतीकात्मक ताबा सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की सेक्युरिटायझेशन अँड रीकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 या अधिनियमांतर्गत आणि कलम 13(12), सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 3 सह वाचून त्याअन्वये मिळालेल्या अधिकाराचा वापर करुन, प्राधिकृत अधिकाऱ्याने खालिल खात्यासमोर नमूद दिनांकेला मागणी नोटिस कर्जदार निर्गमित केली असून त्यात कथित सूचना मिळाल्यापासून 60 दिवसांच्या आत ती रक्कम परत करण्याची सूचना देण्यात आली होती. कर्जदारांनी कर्जाची परतफेड न केल्यामुळे याद्वारे कर्जदारांना, आणि सर्वसाधारण जनतेला नोटिस देण्यात येते की खाली सही करणाऱ्याने येथे खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा, कथित ॲक्टचा सेक्शन 13(4) हा, कथित नियम 8 सह वाचला असता त्याखाली त्याला दिलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली दिलेल्या खात्यासमोर निर्देशित केलेल्या तारखेला घेतलेला आहे. याद्वारे कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला मालमत्तेसंबंधात कोणताही व्यवहार न करण्याचा सावधगिरीचा इशारा देण्यात येत आहे आणि मालमत्तेबाबत करण्यात आलेला कोणताही व्यवहार हा रकम, व्याज, खर्च आणि शुल्कसाठी बंधन बँक लिमिटेडच्या प्रभारांच्या अधीन असेल. प्रतिभूत मत्ता सोडवून घेण्यासाठी, उपलब्ध वेळेच्या संबंधात, अधिनियमाच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे/मोर्टगेजरचे लक्ष वेधण्यात येत आहे.

| कर्जदाराचे नाव आणि कर्ज खाते क्रमांक | मालमत्तेचे वर्णन (सुरक्षित मालमत्ता) | मागणी नोटिसेची दिनांक | प्रतीकात्मक ताबा दिनांक | मागणी सूचनेच्या दिनांकेला थकित रक्कम |
|---|---|---|---|---|
| श्री. अरुण सिताराम देशमुख<br>श्रीमती. कांचन अरुण देशमुख<br>411/1187 | फ्लॅट क्र. 202 (400 चौ. फू.) 2 रा मजला, ए विंग, साई कॉम्प्लेक्स, सर्व्हे क्र. 178 वर बांधलेले, एन/ए प्लॉट क्र. 1, बी आणि 1सी, पोस्ट ऑफिस-पाली, ता. सुधागड, पाली, जि. रायगड, महाराष्ट्र 410205 येथे स्थित असलेल्या स्थावर मालमत्तेचे सर्व खंड व भूभाग आहेत आणि ही मालमत्ता खालीलप्रमाणे वेढलेली आहे:<br>उत्तर: खुली जागा, पूर्व: खुली जागा, पश्चिम: फ्लॅट क्र. 203, दक्षिण: फ्लॅट क्र. 201 | 13.12.2021 | 14.02.2022 | रु.10,86,175.45 |
| श्री. महेंद्र महादेव भिल्लारे<br>श्रीमती. हेमलता महेंद्र भिल्लारे<br>411/1791 | फ्लॅट क्र. 302, ग्रामपंचायत मिळकत क्र. 2677/302, 583.00 मोजमापाचे क्षेत्र, 3 रा मजला, स्वराज कॉम्प्लेक्स, एस. क्र. 50/2ए, बुर्माली रोड, धुंडिविनायक नगर, मुं/पोष्ट पाली, ता. सुधागड, पाली (सीटी), रायगड, महाराष्ट्र - 410205 येथे स्थित असलेल्या स्थावर मालमत्तेचे सर्व खंड व भूभाग आहेत आणि ही मालमत्ता खालीलप्रमाणे वेढलेली आहे:<br>उत्तर: जिना, पूर्व: खुली जागा, पश्चिम: फ्लॅट क्र. 301, दक्षिण: खुली जागा | 25.11.2021 | 14.02.2022 | रु.11,13,879.61 |
| श्री सुशिल राजदेव त्रिपाठी<br>श्रीमती. सीमा सुशिल कुमार त्रिपाठी<br>411/1793 | घर क्र. 2491/3, फ्लॅट क्र. 3, 581.25 चौ.फू. मोजमापाचे क्षेत्र, ओस्वाल प्लाझा येथे वसलेले, एस. क्र. 27/3, जी बी वेडर हाय स्कूल जवळ, मधली आळी, मुं/पोष्ट पाली, सुधागड, पाली (सीटी), रायगड, महाराष्ट्र - 410205 येथे स्थित असलेल्या स्थावर मालमत्तेचे सर्व खंड व भूभाग आहेत आणि ही मालमत्ता खालीलप्रमाणे वेढलेली आहे: उत्तर: खुली जागा, पूर्व: जिना, पश्चिम: जिना, दक्षिण: खुली जागा | 25.11.2021 | 14.02.2022 | रु.7,89,227.10 |
| श्रीमती. जान्हवी विजय फाटक<br>श्री. विजय माधव फाटक<br>श्री. दीपक माधव फाटक<br>श्रीमती. मालती माधव फाटक<br>श्रीमती. अश्विनी अरविंद पाटणकर<br>411/1774 | घर क्र. 12/40ए, 3504.00 चौ. फू. मोजमापाचे क्षेत्र, सर्व्हे क्र. 1985/ए, बोरगाव रोड, दातार आळी, तलावासमोर, पेण, ता. पेण, जि. रायगड, महाराष्ट्र - 402107 येथे स्थित असलेल्या स्थावर मालमत्तेचे सर्व खंड व भूभाग आहेत आणि ही मालमत्ता खालीलप्रमाणे वेढलेली आहे:<br>उत्तर: बोरगाव रोड, पूर्व: गोविंद सदन सोसायटी, पश्चिम: श्री. एन. एस. पवार यांचे घर, दक्षिण: नारायण निवास | 25.11.2021 | 14.02.2022 | रु.29,06,953.26 |
| श्री. कुणाल विलास नाईक<br>श्रीमती. रंजना विलास नाईक<br>श्री. विलास पांडुरंग नाईक<br>411/1743 | फ्लॅट क्र. 102, 500 चौ. फू. मोजमापाचे बिल्टअप क्षेत्र, ए-वींग, रमाई कॉम्प्लेक्स, सीटीएस क्र. 963ए सह बांधलेले, प्रभू आळी, ता. पेण, जि. रायगड, महाराष्ट्र - 402107 येथे स्थित असलेल्या स्थावर मालमत्तेचे सर्व खंड व भूभाग आहेत आणि ही मालमत्ता खालीलप्रमाणे वेढलेली आहे:<br>उत्तर: जिना, पूर्व: फ्लॅट क्र. 101, पश्चिम: खुली जागा, दक्षिण: अंतर्गत रस्ता | 16.12.2021 | 14.02.2022 | रु.14,00,888.64 |

**स्थळ: रायगड**
**तारीख: 19/02/2022**

**अधिकृत अधिकारी**
**बंधन बँक लिमिटेड**

# चुकीच्या ऑडीटमुळे उलट प्रवास

## आंबेत पुलाच्या बंद अवस्थेमुळे प्रवाशांची दिशा गुल

## संरचना कंपनीची चौकशी होण्याची स्थानिकांची मागणी

**। आंबेत । वार्ताहर ।**

आंबेत सावित्री पूल हा दोन वर्षाच्या प्रतिक्षेनंतर सुरु होऊन पुन्हा एकदा तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने हा पूल कोसळण्याची भीती वर्तविण्यात आली आहे. याच अनुषंगाने दिनांक १२ फेब्रुवारी रोजी हा पूल सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद करण्यात आला.



सुमारे ११ कोटी या पुलावर खर्च करण्यात आले. दुर्दैवी बाब अशी कि आज पुन्हा एकदा याच मार्गावरून प्रवाश्यांना जवळजवळ ७० ते ८० किमीचा उलट दिशेने मुंबई-गोवा महामार्ग, महाड दासगाव, दादली, चिंभावे, म्हाप्रळ या मार्गाने मंडणगड, दापोली, खेड, उतंबर, हर्णे, केळशीकडे जाण्यासाठी प्रवास करावा लागत आहे. संबंधित अधिकारी वर्गाच्या नाकर्तेपणामुळे हि परिस्थिती ओढवली आहे. यासंदर्भात काम करीत असलेल्या संरचना कंपनीची देखील सखोल चौकशी करण्यात यावी असा सवाल स्थानिक नागरिकांकडून उपस्थित होत आहे. गेल्या दोन वर्षापासून पुलाच्या कामात निव्वळ मलमपट्टीच लावण्याचे काम करण्यात आले आहे. म्हणूनच आज ही परिस्थिती आंबेत सावित्री पुलासंदर्भात निर्माण झाली आहे आणि यामुळेच प्रवाशी वर्गाचा चिंतेचा प्रश्न बनला आहे. रायगड लोकसभा मतदार संघाचे खा. सुनील तटकरे यांनी संबंधित पुलासंदर्भात तातडीने मंत्रीमंडळात योग्य निर्णय घेऊन प्रवाशांच्या पर्यायी वाहतुकीचा मार्ग मोकळा केला. परंतु अद्याप कोणतीही यंत्रणा आंबेत बंदर परिसरात दाखल झालेली नसून स्थानिक नागरिकांना दळणवळण बाजारपेठ, दवाखाने मेडिकल इत्यादी अत्यावश्यक सेवेकरिता मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

> आंबेत सावित्री पुलाच्या बंद अवस्थेमुळे आमच्या सारख्या स्थानिक नागरिकांना देखील २ किमीच्या अंतरासाठी ६० ते ७० किमीचा उलट प्रवास करावा लागत आहे. अद्याप कोणतीही पर्यायी यंत्रणा या परिसरात दाखल झालेली नसून प्रशासनाने याकडे गंभीरतेने बघितले पाहिजे.
> – जितेंद्र सावंत, जि.प.सदस्य

# उरणमध्ये गरजूंना सायकलचे वाटप

## शेरॉन बायोमेडिसीन लि. व सेंटर फॉर ट्रान्सफॉरमिंग इंडियाचा उपक्रम

**। उरण । वार्ताहर ।**

उरण परिसरातील गरजू विद्यार्थीनींना शैक्षणिक प्रगतीसाठी शेरॉन बायोमेडिसीन लि. व सेंटर फॉर ट्रान्सफॉरमिंग इंडिया यांच्या वतीने सायकलींचे वाटप करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करीत या उपक्रमामुळे या परिसराची शैक्षणिक प्रगती निश्चित उंचावेल असा विश्वास व्यक्त केला.



उरण परिसरातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला गती देण्यासाठी सामाजिक भावनेतून ग्रामीण भागातील मुलींना सायकलचे वाटप करण्यात आले. यावेळी परिसरातील केगाव, कोटनाका, टेलिपाडा, मोरा, म्हातोली, जासई, बोकडविरा, कोळीवाडा, फुंडे, बोरी आणि करळपाडा या गावातील काही विद्यार्थिनी अतिशय गरीब कुटुंबातील असून त्यांना शिक्षणासाठी व अन्य गोष्टींसाठी पायी चालत जावे लागत होते. या विद्यार्थिनींची दखल घेत शेरॉन कंपनीमार्फत ५० विद्यार्थिनींना सायकल वाटप करण्यात आले.

यावेळी शेरॉन बायोमेडिसीन कंपनीच्या वतीने डॉ.दिपक घाटे व निती मेश्राम या अधिकाऱ्यांनी प्रमुख हजेरी लावली होती. तसेच उरणमधील सीमा घरत सामाजिक कार्यकर्ते, यशवंत पाटील सामाजिक कार्यकर्ते व परिसरातील नागरीक या कार्यक्रमाला हजर होते.

## महत्वाचे

### आज शिवजयंती उत्सवाचे आयोजन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

सालाबादप्रमाणे मराठा कर्मचारी मित्रमंडळ माणगाव यांच्यावतीने आज (दि.१९) सायंकाळी ७ वाजता अशोकदादा साबळे विद्यालय माणगाव येथे स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. महाराजांच्या शौर्याला अभिवादन करण्यासाठी आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला सर्व मान्यवरांनी तसेच मित्रपरिवार यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

### वडवली येथे विश्वकर्मा जयंती साजरी

**। दिघी । वार्ताहर ।**

श्रीवर्धन तालुक्यातील वडवली येथे सुतार समाजातर्फे २५ वी भगवान श्री विश्वकर्मा जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सुतार समाज व महिला मंडळ यांच्या संयुक्तपणे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. स्थानिक कलाकारांनी सादर केलेल्या इंद्र वर्सेस इंद्र या दोन अंकी तुफान विनोदी नाटकाला नाट्यप्रेमींनी भरभरून दाद दिली.

### पुण्यस्मरणानिमित्त विद्यालयाला दिली देणगी

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यातील खडसाबले गावचे माजी पोलीस पाटील कै.रमाकांत विठ्ठल धानुधरे यांच्या शुक्रवारी (दि.१८) प्रथम पुण्यस्मरणानिमित्त त्यांचे चिरंजीव विजय रमाकांत धानुधरे आणि कुटूंबियांकडून संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव या विद्यालयाला वडिलांच्या स्मरणार्थ वर्ग खोली सजावट करण्यासाठी रोख रक्कम तीस हजार रुपये देणगी देऊन शिक्षणकार्यास हातभार लावला. त्याच्या या सत्कार्याबद्दल भोराई शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुरेश खैरे यांनी धन्यवाद दिले.

# नागांव आरोग्यकेंद्रात मोफत आरोग्य तपासणी



**। अलिबाग । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील नागाव ग्रामपंचायतीमध्ये मोफत रक्त व शुगर तपासणी कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सरपंच निखिल मयेकर यांनी आरोग्यतपासणी शिबिरास भेट देऊन आढावा घेतला.

या शिबिरास ग्रामपंचायत हद्दीतील एकूण ७० ग्रामस्थांनी रक्ततपासणी करून घेत लाभ घेतला. तसेच रक्ताचा रिपोर्ट आल्यानंतर रिपोर्टप्रमाणे सर्वांना मोफत औषधे देण्यात येणार आहेत व पुढील मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

# नागोठण्यात शांतता समितीची बैठक

## जातीय सलोखा राखण्याचे आवाहन

**। नागोठणे । वार्ताहर ।**

नागोठण्यात हिंदू-मुस्लीम ऐक्याची परंपरा आहे. येथील दोन्ही समाजबांधव एकमेकांच्या सणांमध्ये मिसळतात. नागोठण्यात पूर्वीप्रमाणेच शांत वातावरण यापुढेही राहिले पाहिजे ही अपेक्षा आहे. काही चुकीच्या गोष्टींमुळे जातीय सलोखा बिघडविण्याचे काम होत असते. घडून गेलेल्या गोष्टींवर वाद करणे चुकीचे आहे. त्यामुळे एकमेकांची मने कलुषित होतात. त्यामुळे भविष्यात काही चुकीचे घडत असेल तर लगेच पोलिसांना कळविल्यास नक्कीच योग्य ती दखल घेतली जाईल. कारण जागरूक नागरिक हेच पोलिसांचे नाक, कान व डोळे आहेत असे उद्गार काढून जातीय सलोखा राखण्याचे आवाहन नागोठण्याचे पोलीस निरीक्षक तानाजी नारनवर यांनी केले.

आगामी शिवजयंती उत्सव व इतर सणांच्या पार्श्वभूमीवर नागोठणे पोलीस ठाण्यात गुरुवारी (दि.१७) सायंकाळी आयोजित केलेल्या शांतता समितीच्या बैठकीत ते बोलत होते. सोशल मिडीयाचा वाढता प्रभाव पाहता वाद निर्माण करणारे चुकीचे संदेश न टाकणे, ते संदेश न वाचताच पसरविणे यामुळे वादाचे वातावरण निर्माण होऊन नागरिक लगेच रस्त्यावर उतरत असतात. मात्र नागोठण्यात तसे काही नसल्याने यापुढेही ही काळजी घेणे



गरजेचे असून यासाठी पोलीस व न्यायालय आहे. त्यामुळे कुणीही कायदा हातात घेऊ नये अन्यथा संबधितांस कारवाईला सामोरे जावे लागेल असेही त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीला मनसेचे जिल्हा संघटक गोवर्धन पोलसानी, रोहा पं.स.सदस्य बिलाल कुरेशी, बापूसाहेब रावकर, मनोज धात्रक, निखील मढवी, ज्ञानेश्वर साळुंखे, चेतन कामथे, सगीर अधिकारी, अशपाक पानसरे, जितेंद्र जाधव, पुंडलिक ताडकर, मंदार चितळे, धनंजय जगताप, नारायण म्हात्रे, बाबा मुल्ला आदी उपस्थित होते.




# विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी नगराध्यक्षांना निवेदन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव नगरीतील आपल्या विविध मागण्यांबाबत नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांना नगरपंचायत कार्यालयात शुक्रवारी (दि.१८) निवेदन देऊन या मागण्या पूर्ण कराव्या अशी मागणी बौद्ध धम्म सामाजिक संस्था माणगावचे संस्थापक अध्यक्ष पंकज तांबे यांनी केली.



छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श भावी पिढीच्या नजरेसमोर सतत रहावा यासाठी मुंबई-गोवा महामार्गावर माणगाव नगरपंचायतसमोरील चौकास छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव देऊन त्यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा तसेच माणगाव बसस्थानकावरील चौकास डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देऊन पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा अशी मागणी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांच्याकडे बौद्ध धम्म सामाजिक संस्था माणगावचे संस्थापक अध्यक्ष पंकज तांबे यांनी करून नवनिर्वाचित नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी नगरपंचायतीचे गटनेते तथा नगरसेवक प्रशांत साबळे, बौद्ध धम्म सामाजिक संस्थेचे उपाध्यक्ष स्वप्नील शिर्के व सरचिटणीस संभाजी गायकवाड आदी उपस्थित होते.

# श्रीवर्धन कोमसाप अध्यक्षपदी सीमा रिसबूड नियुक्त



**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

कोकण मराठी साहित्य परिषद, रायगडचे नूतन अध्यक्ष सुधीर शेठ यांच्या सूचनांप्रमाणे श्रीवर्धन शाखेचे अध्यक्ष दिलीप हेंद्रे यांच्या अध्यक्षतेखाली दि.१७ रोजी शाखेची विशेष सर्वसाधारण सभा संपन्न झाली. सभेमध्ये संस्थेच्या क्रियाशील सदस्या, कवयित्री सीमा शशिकांत रिसबूड यांची श्रीवर्धन शाखेच्या अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. त्यांच्या नावाची सूचना अनघा चौगुले यांनी मांडली तर मंजिरी जोशी यांनी अनुमोदन दिले.

निवड झाल्यावर मावळते अध्यक्ष दिलीप हेंद्रे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. रिसबूड यांनी शाखेचे अध्यक्षपद यापूर्वीही समर्थपणे भूषविले असून त्या उत्तम कवयित्रीही आहेत.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- विवाह, पुर्नविवाह सर्वजातीय आंतरजातीय स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ. ८८८८९३५७७५, ९२७०४३३४८७
- अलिबागमधील ऑफिसकरिता आर्किटेक्ट, इंटिरियर डिझायनर आणि ड्राफ्ट्समन पाहिजे. मोबाईल नंबर- ८००७४५२१४६
- ॲडव्हान्स लेव्हल शेअर मार्केट कोर्स, Investomax कामत आळी, अलिबाग- ७७४४०८८४०४
- अलिबागमध्ये ११८३ Sqft फ्लॅट विकणे आहे. संपर्क : ९६८९७६७७०७
- अलिबागमध्ये हार्डवेअरच्या दुकानात कामासाठी मुले पाहिजेत. संपर्क- ०२१४१-२९५१११/९४२२६९०८५४
- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- अलिबाग-चोंढी येथे लेडीज ब्युटी पार्लर कामासाठी अनुभवी मुली पाहिजेत. ८१४९८६५६२५, ९९२१०७३९६३
- सफाईदार इंग्लिश बोलण्याची सर्वांची तीव्र इच्छा निश्चित पूर्ण करणारे सर्वात जुने, अनुभवी आशास्थान- ९८२२८४२८१०

जाहिरातीसाठी संपर्क
☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# प्रदर्शनातून आरोग्यदायी आहाराची माहिती

**। खांब-रोहे । वार्ताहर ।**

नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब या शिक्षण संस्थेच्या श्रमिक विद्यालय चिल्हे येथील विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाचे माध्यमातून आरोग्यदायी आहाराची माहिती देऊन सुदृढ शरिरासाठी पोषक आहार कसा आवश्यक आहे याबाबत माहिती दिली.



शालेय विविध उपक्रमांतर्गत विद्यार्थी वर्गाने सदरचा उपक्रम विद्यालयात राबविण्यात आला. या उप्रक्रमांतर्गत विद्यार्थी वर्गाने स्वतः विविध भाज्या, फळे आणून त्यांची व्यवस्थितपणे कापून डिशमध्ये रचना करून ठेवण्यात आली. या उपक्रमाचा उद्देश म्हणजे जंक फुडपेक्षा हेल्दी फुड आरोग्यासाठी फायदेशीर असून आपण आपल्या आहारात केवळ हेल्दी फुडचाच वापर करावा हाच संदेश या उपक्रमाचे माध्यमातून देण्यात आला. तर विविध स्लोगन व सुविचारांच्या मदतीनेही याबाबत अधिक माहिती देण्यात आली. या उपक्रमाबाबत मुख्याध्यापक दिपक जगताप यांनी कौतुक केले.

Shrinath
Group of Companies
SINCE 1978
पनवेल मधील नामांकित कंपनीसाठी
JSW बस साठी ड्राइव्हर आणि क्लिनर पाहिजे
श्रीनाथ ट्रॅव्हल एजन्सी प्रा. लि
001, पहिला मजला, स्टॅन्ड व्हूव अपार्टमेंट, रत्नदीप हॉटेल जवळ, बस डेपो मागे, पनवेल - 410 206.
संपर्क : 99200 44033

# पाली : सभापती निवड बिनविरोध

## सार्वजनिक बांधकाम समिती सभापतीपदी प्रणाली पाटील

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यातील पाली नगरपंचायतीच्या विषय समिती सभापती निवडीसाठी पाली तहसील कार्यालयात हिरकणी कक्षात विशेष सभा संपन्न झाली. या समित्यांची सभापती निवड ही बिनविरोध झाली आहे.



यामध्ये सार्वजनिक बांधकाम समिती सभापती पदी प्रणाली पाटील, स्वच्छता व वैधक सार्वजनिक आरोग्य समिती सभापतीपदी विनायक जाधव, पाणी पुरवठा व जलनिसरण समिती सभापतीपदी सुलतान बेनसेकर, महिला व बाल कल्याण, पर्यटन समिती सभापतीपदी नलिनी म्हात्रे यांची निवड झाली आहे. तर नियोजन, विकास, क्रीडा, सांस्कृतिक व दिवाबत्ती समिती सभापतीपदी उपनगराध्यक्ष आरिफ गफुर मणियार यांची निवड झाली आहे.

राष्ट्रवादी व शेकाप आघाडीकडून पाच अर्ज भरले होते ते सर्व वैध ठरले. तसेच प्रतिस्पर्धी नसल्याने सर्व सभापती निवड बिनविरोध झाल्याचे उपविभागीय अधिकारी डॉ. माने यांनी जाहीर केले. प्रत्येक समितीसाठी एकमेव अर्ज आल्याने निवडी बिनविरोध झाल्या. सभापती निवडीचे काम उपविभागीय अधिकारी डॉ.यशवंत माने व मुख्य कार्यकारी अधिकारी अंगाई साळुंखे यांनी पाहिले. यावेळी नगराध्यक्षा गीता पालरेचा, मा.आ.धैर्यशील पाटील, जि.प.सदस्य सुरेश खैरे, उपनगराध्यक्ष आरिफ मणियार, रमेश साळुंखे, संदीप दपके, संजोग शेठ, नगरसेवक व नगरसेविका, स्वीकृत नगरसेवक तसेच नगरपंचायतीचे कर्मचारी उपस्थित होते.



# अलिबागमध्ये अभिरूप न्यायालय स्पर्धा

## ॲड. दत्ता पाटील लॉ कॉलेजमध्ये आयोजन

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

विधी महाविद्यालयात विधी अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची अभिरूप न्यायालय स्पर्धा (मूटकोर्ट) आयोजित करण्यात आली. स्पर्धेचे उद्घाटन जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील यांनी केले. या कार्यक्रमात मार्गदर्शक आणि परिक्षक म्हणून जेष्ठ विधीज्ञ ॲड.मानसी म्हात्रे यांना आमंत्रित करण्यात आले होते.

याप्रसंगी प्राचार्या डॉ. रेश्मा पाटील, उप प्राचार्या निलम हजारे आणि प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. या स्पर्धेत तीन वर्ष अभ्यासक्रमातील राकेश सावंत, प्रज्ञा शिरधनकर, योगीराज सर्पे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि उत्तेजनार्थ आणि पाच वर्षे विधी अभ्यासक्रमातील झेबुनिसा हसवारे, संकल्प गायकवाड यांनी अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले.

# कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदीनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण परिस्थितीला तोंड देऊन पोटाची खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका नातेवाईकाला






एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**

कै. श्री. पुरुषोत्तम रामचंद्र भातखंडे, स्मरणार्थ, महाड

## संपादकीय

# नद्यांचे वाढते प्रदूषण

भारतीय संस्कृतीत नद्यांना अनन्यसाधारण असे महत्त्व अनादिकालापासून आहे. जी गावे, शहरे नद्यांच्या काठावर वसलेली आहेत, ती शहरे, गावे सुखीसंपन्न म्हणून ओळखली जातात. बारमाही वाहणाऱ्या नद्यांमुळे या परिसरातील जमीन नेहमीच सुपीक होत राहिलेली आहे. दुर्दैवाने आता याच नद्यांना प्रदूषणाचे ग्रहण लागले आहे. कारण, महाराष्ट्रात सर्वच नद्यांचे वाढलेले प्रदूषण हा चिंतेचा आणि गांभीर्याने घेण्याचाच विषय बनले आहे. अगदी दोनच दिवसांपूर्वी राष्ट्रीय हरित लवादाने महाराष्ट्रातील श्रीक्षेत्र पंढरपुरातील चंद्रभागा आणि नाशिक येथील गोदावरी नदीचे पाणी मानवी जीवनास पिण्यास अयोग्य असल्याचे जाहीर केलेले आहे. हे अतिशय गंभीरच म्हटले पाहिजे. कारण, पंढरपूर असो वा नाशिक, ही महाराष्ट्रातील नामांकित तीर्थक्षेत्रे. दरवर्षी या तीर्थक्षेत्रांना लाखो भाविक भेट देत असतात. पंढरीतून वाहणाऱ्या चंद्रभागेत अथवा नाशिकमधील गोदावरीच्या पाण्यात स्नान करणे, एकप्रकारे पुण्य समजले जाते. पण, आता हेच पाणी मानवाच्या जीवावर उठले आहे. कारण, वाढत्या प्रदूषणाने या दोन्ही नद्यांचे पाणी मानवी जीवनास अपायकारक असल्याचा निष्कर्ष राष्ट्रीय हरित लवादाने काढला आहे. नुकत्याच झालेल्या माघी एकादशीच्यावेळी चंद्रभागेच्या पात्रातील सर्व पाणी बाहेर काढून नव्याने पाणी सोडण्यात आले होते. तरीही ते पाणी प्रदूषित झाल्याचे दिसून आलेले आहे. दरवर्षी या तीर्थक्षेत्रांना भेटी देणाऱ्या भाविकांची संख्याही लक्षणीय असते. त्यामुळे तेथील सांडपाण्याची व्यवस्थेची अतिशय दुरवस्था झालेली आहे. दरवर्षी आषाढी, कार्तिकी यात्रांना सरकारतर्फे हजारो शौचालयांची निर्मिती करते. पण, ती व्यवस्थाही अपुरीच पडते. त्यामुळे ते सर्व सांडपाणी चंद्रभागेच्या पात्रातच मिसळते आणि त्याचा परिणाम हा नदीचे पाणी प्रदूषित होण्यावर होत राहतो. या दोन नद्यांची ही अवस्था अशी, तर अन्य नद्यांची स्थिती काय असेल, हे सांगणे कठीणच. रायगड, कोकणातील नद्याही याला अपवाद ठरणाऱ्या नाहीत. कारण, रायगडातील सावित्री, कुंडलिका, अंबा, भोगावती, गाढी, पाताळगंगा या प्रमुख नद्यांचेही पाणी प्रदूषित झाल्याचे वेळोवेळी उघडकीस आलेले आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील वाशिष्टी, जगबुडी या नद्यांची अवस्थाही अशीच आहे. कारण, या नद्यांच्या काठावरच विविध रासायनिक कंपन्या आपले बस्तान बांधून बसलेल्या आहेत. या रासायनिक कंपन्यांतून दररोज लाखो लीटर्स पाणी नद्यांच्या पात्रात बिनदिक्कतपणे सोडले जाते. त्याचा विपरित परिणाम मानवी जीवनावर होतोच. शिवाय, नद्यांच्या पात्रात असलेल्या जैवविविधतेवरही याचा विपरित परिणाम होताना दिसतोय. दरवर्षी या नद्यांच्या पात्रात लाखो मासे मृतावस्थेत पडलेले आढळतात. शिवाय, कृषीक्षेत्रावरही याचा मोठा दुष्परिणाम झाल्याने लाखो हेक्टर शेती नापिक बनत चालली आहे. फळबागांचे उत्पादनही दरवर्षी घटताना दिसत आहे. याला सर्वस्वी नद्यांचे वाढते प्रदूषणच कारणीभूत आहे. या वाढत्या प्रदूषणाकडे प्रदूषण नियंत्रण मंडळाचे हेतूतः होत असलेले दुर्लक्षच कारणीभूत ठरत आहे. प्रदूषण करणाऱ्या कंपन्यांवर थातुरमातुर कारवाई करण्यापलिकडे हे मंडळ काहीच कारवाई करु शकत नाही. अनेकदा राजकीय लागेबांधेमुळे त्या कंपनीवर कारवाई करण्यासही टाळाटाळ होत राहते. हे अनेकदा घडलेले आहे. त्यामुळे प्रदूषण कसे रोखायचे, हा एक मोठा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. मोदी सरकार सत्तेवर आल्यावर त्यांनी 'नमामि चंद्रभागा, नमामि गोदावरी, नमामि गंगा' अशी मोहीम राबविली खरी; पण त्या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यास केंद्र आणि राज्य सरकारला यश आलेच नाही. उलट, डोळ्यादेखत पवित्र नद्या प्रदूषित होत राहिल्या. कोकणातील सर्वच नद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात मासेमारी चालते. पण, वाढत्या प्रदूषणाने या मासेमारीवर विपरित परिणाम झाल्याचे दिसत आहे. कारण, या मत्स्यव्यवसायावर हजारो कुटुंबांचा उदरनिर्वाह चालतो. पण, प्रदूषणाने मत्स्य उत्पादनच घटल्याने मासेमारी घटली आहे. हे कोकणातील सर्वच जिल्ह्यांमध्ये घडताना दिसतेय. ऐन पावसाळ्यात तर कंपन्यांचे प्रदूषित पाणी थेट नदीच्या पात्रात सोडले जाते. ते पाणी समुद्रास मिळत असल्याने सागरालाही प्रदूषणाचा त्रास सहन करावा लागतो. वास्तविक, पावसाळ्यात मासेमारी बंद असते. हा काळ मत्स्य प्रजननानाचा ओळखला जातो. पण, वाढत्या प्रदूषणाने या प्रजननावरही विपरित परिणाम होताना दिसतो. हे कुठेतरी थांबले तरच नद्यांचे होणारे प्रदूषण रोखले जाईल, अन्यथा भविष्यात या नद्या पवित्र सोडाच; अपवित्र, म्हणजे प्रदूषित झालेल्या असतील, हे नाकारता येणार नाही.

# परस्त्री सन्मान : हाच शिव राजधर्म

रणवीर राजपूत

महाभाग्यवान मी... महाराष्ट्र माझी मायभूमी... महाराजांचीच ही महतकरणी! शुक्रवारचा दिवस होता, रात्रीची वेळ होती.अवघ्या शिवनेरीच्या मुखावर औत्सुक्य, आनंद अन् काळजी झळकत होती. साऱ्या गडाचे लक्ष लागले होते ते जिजाऊंकडे. शिवनेरीत बांधलेला पाळणा मोठ्या प्रतिक्षेत होता. क्षणातच आनंद उधळीत एक बातमी चोही दिशेला वाऱ्यासारखी पसरली. पुत्ररत्न झाला.. पुत्ररत्न झाला! गडावरील सारं वातावरण ढवळून निघालं होतं. गडावर सर्वत्र नगारे-चौघडे वाजू लागले होते. चोहीकडून एकच वार्ता कानावर पडत होती. जिजाऊंच्या उदरी झाला शिवबाचा जन्म अन् जणू काय.. हिंदवी स्वराज्याचा क्रांतीसूर्यच उदयास आला. रयतेचं तोंड गोड करण्यासाठी सर्वत्र साखरेचं वाटप होत होतं. लोकांच्या चेहऱ्यावर आनंदाची झलक ठळकपणे दिसत होती. मांसाहेब जिजाऊंच्या मुखावर सोन्यावानी चमक झळकत होती. खरं तर, त्यांचा आनंद गगनात मावत नव्हता. त्यांना आकाशही ठेंगणं वाटत होतं. तो भाग्यवान दिवस म्हणजे १९ फेब्रुवारी. चला तर, शिवजयंतीनिमित्त आपण सर्वधर्मीय लोक. शिवछत्रपतींच्या शौर्यगाथेला त्रिवार मानाचा मुजरा करूया! बोला... छत्रपती शिवाजी महाराजांचा विजय असो! जय भवानी जय शिवाजी!



छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या कल्याण नगरीला महाराजांनी भारतातल्या पहिल्या आरमाराची स्थापना करण्याचा मान दिला. शत्रू पक्षाला गाफील ठेऊन गनिमी काव्याच्या युद्धतंत्राद्वारे शिवबाचे सैनिक कल्याण खाडीतून आरमाराद्वारे हल्ले करायचे. केवळ भारतातल्या शत्रूंनाच नव्हे तर, डच, पोर्तुगाल, इंग्रज, मोगल आदींना सुद्धा शिवाजी महाराजांच्या आरमार यंत्रणेने जेरीस आणले होते. हिंदुस्थानाच्या इतिहासात सागरी बळाची उपयुक्तता व ताकद ओळखली ती शिवरायांनी. त्यांनी आरमाराची या देशात प्रथम सूत्रबद्ध उभारणी केली. त्यामुळे त्यांना हिंदुस्थानी आरमाराचे आद्यप्रणेते म्हणतात. महाराजांच्या जंगी बेड्यात सुमारे ७४ गलबते होती. अर्थातच शिवकालीन काळात महाराजांच्या आरमार दलाचा सर्वदूर दबदबा होता. दरम्यान दिपावलीच्या शुभमुहूर्तावर म्हणजेच २४ ऑक्टोबर १६५७ रोजी शिवरायांनी कल्याणला स्वतंत्र करून दुर्गाडीवर आपल्या हिंदुत्वाचा भगवा फडकवला. मराठी स्वराज्याची मुहूर्तमेढ कल्याणहून करून पुढे शिवरायांनी युद्धकौशल्याच्या बळावर सलग ४० किल्ले सर केलेत. राष्ट्रभक्तीसह हिंदुत्वाची भावना रयतेच्या मनात बिंबविण्याच्या दृष्टिकोनातून शिवबाने जिजाऊंच्या संकल्पनेतून दुर्गाडी किल्ल्यावर भवानीदेवीची प्रतिष्ठापना केली. यास्तव आम्ही कल्याणकर मांसाहेब जिजाऊ अन् शिवरायांचे ऋणाईत होऊन त्यांना त्रिवार मानाचा मुजरा करतो!

मित्रहो, १६७४ साल उजाडलं अन् मराठी राज्याच्या इतिहासात एक नवं पर्व सुरू झालं. परंतु याआधीच्या काळात शिवरायांच्या राज्याभिषेकसंदर्भात स्वकियांनी आणि परक्यांनी अनेक वेळा अडथळे आणले. त्यामुळे जिजामाता अत्यंत व्यथित झाल्या होत्या. त्या नेहमी शिवबाच्या राज्याभिषेकबाबत चिंतित असायच्या. शेवटी जिजामाताच्या अथक प्रयत्नांना यश आलं. काशीच्या गागाभट्टांना शिवबाच्या राज्याभिषेकचे पौरोहित्य सोपविण्यात आले.त्यासाठी रायगड नटूनथटून उभा होता. जिजाऊंच्या आनंदाला पारावारच उरला नव्हता. हा अभूतपूर्व सोहळा पाहण्यासाठी रायगडावर मोठी गर्दी उसळली होती. रायगडाच्या प्रवेशद्वारावर देशी व परदेशी पाहुण्यांच्या स्वागतासाठी गजराज उभे ठाकले होते. ६ जून १६७४ रोजी पहाटे पाचच्या सुमारास शिवबाचा राज्यारोहण सोहळा संपन्न झाला. तोफांच्या सलामीनं अन् तुतारींच्या निनादात किल्ले रायगडावरील वातावरण ढवळून निघालं होतं. याप्रसंगी शिवरायांच्या नावाचा सर्वत्र जयघोष होत होता. गुलालाची उधळण होऊन किल्ल्याचा सारा परिसर भगवामय होऊन आनंदाने बहरून गेला होता.राज्याभिषेक झाल्यावर शिवाजी महाराजांच्या नावापुढे **छत्रपती** अश्या एका अर्थानं नामकरण झालं. जिजाऊंच्या डोळ्यांचे पारणं फिटलं. जीवनाचं अखेरचं स्वप्न साकार झाल्याने त्यांच्या चेहऱ्यावरील काळजी जणू एकाएक नाहिशी झाली. त्या तृप्त झाल्या.त्या धन्य झाल्या. त्यांना याची देही याची डोळा शिवबाचा राज्याभिषेक पहावयास मिळाला. राज्याभिषेक झाल्यानंतर रितसर ते सिंहासनावर विराजमान झाले. त्यांनी गागाभट्ट आणि जिजाऊ मातेचं चरणस्पर्श करून आशिर्वाद घेतले. जिजाऊ या शिवछत्रपतींची दृष्ट काढत म्हणाल्या शिवबा तुम्ही राजा झालात, रयतेचे राजा झालात. महत्त्वाचे म्हणजे तुम्ही छत्रपती झालात. आता तुम्ही आदर्श राजा होऊन पृथ्वीवर किर्तीमान व्हा. शिवबाचा राज्याभिषेक व्हावा, यासाठी जिजाऊंनी आपला जीव जणू मुठीत घट्ट धरून ठेवला होता. कारण हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेसाठी शिवबाला छत्रपती करून त्या अवघ्या आठवड्यातच देवाघरी गेल्या. धन्य त्या जिजाऊ मांसाहेब! आम्ही मां जिजाऊंना दंडवत नमन करतो.

शिवबा हे मातृभक्त होते. ते मातेची आज्ञा शिरसावंद्य मानत असत. शिवबांचे पिताश्री शहाजीराजे हे आदिलशहाच्या दरबारी मोठे सरदार होते. परिणामी मराठी राज्याची धुरा जिजाऊ माँसाहेबाच्या खांद्यांवर आली होती. दरम्यान जिजाऊंनी शिवबाला युद्धतंत्राचे परिपूर्ण प्रशिक्षण देऊन पारंगत केलं. शिवबाला आदर्श राजा बनविण्याचा जिजाऊंचा मानस होता. त्या पार्श्वभूमीवर त्यांना राज्यकारभाराचे बारकावे ज्ञात करून देण्यात आले होते. शिवबाची मातृभक्ती अपरंपार होती, तर जिजाऊंचे पुत्रप्रेम अटूट होतं. शिवबा हे मातेच्या आज्ञेप्रमाणे राज्यकारभार करत असत. एके दिवशी मांसाहेबांनी मला कोंढाणा हवा आहे, अशी इच्छा व्यक्त केली असता, शिवरायांनी लगेच आपले शूरवीर विश्वासू सरदार तानाजी मालुसरे यांना कोंढाणाच्या दिशेने कूच करण्याचा फर्मान सोडला. त्याच दिवशी नेमका त्यांच्या मुलाचा लग्नसोहळा होता. तरी देखील तानाजींनी शिवबाची आज्ञा शिरसावंद्य मानून कोंढाण्यावर स्वारी करून तो सर केला. परंतु तानाजी धारातिर्थी पडले.त्यामुळेच शिवकालीन इतिहासात सुवर्ण अक्षरात लिहिलं गेलं की, 'गड आला पण सिंह गेला!' अशाच जिजाऊंच्या प्रेरणेतून शिवबा अन् त्यांच्या शुरवीर मावळ्यांनी स्वराज्य स्थापनेची आई जगदंबेसमोर शपथ घेतली. शिवाजी महाराजांचे सुपुत्र राजे संभाजी महाराजांनी स्वकियांची बंडाळी मोडीस काढून शंभरहून अधिक युद्धे जिंकली. म्हणूनच शिवकालीन कालखंडाचा उल्लेख इतिहासात 'शिवशंभु' असा आहे.

शिवबा हे परस्त्रीला मातेसमान मानत असत. स्त्री मग ती आपल्या राज्यातली असो वा परक्या मुलखातली, ती मातेसमानच असते, ही शिकवण शिवबांनी सैनिकांसह रयतेलाही दिली. कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला युद्धकैदी म्हणून ताब्यात घेतले असता, ही कृती महाराजांना अजिबात आवडली नाही.त्यांनी त्या परस्त्रीला मातेप्रमाणे आदरतिथ्य करून तिला तिच्या राज्यात सन्मानाने पोहोचविले. या घटनेला शिवकालीन इतिहास साक्षीदार आहे. अशीच एक अप्रिय घटना घडली की, एका गावप्रमुखाने स्त्रीच्या अब्रूशी हेळसांड केली. हे कळल्यावर त्या दोषी व्यक्तीचे हातपाय तोडण्याची शिक्षा देण्याचा महाराजांनी तात्काळ फर्मान काढला. महत्वाचे म्हणजे मांसाहेब जिजाऊंच्या संस्कारांचे हे फलित आहे. शिवबा हे खऱ्या अर्थानं स्त्री स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. स्त्रीयांना स्वरक्षण करता यावे, या उद्देशाने शिवरायांनी आपल्या राज्यातील महिलांना तलवारबाजीचे प्रशिक्षण देण्याची सोय केली होती.तात्पर्य, शिवरायांना स्त्रीयांबद्दल नितांत आदरभाव होता. वास्तवात त्याकाळी परस्त्री सन्मान हाच शिव राजधर्म होता.

शिवबा हे शेतकऱ्यांचे हितचिंतक होते. शेतकरी हा देशाचा अन्नदाता आहे, हा विचार त्यांनी रयतेला दिला. शिवरायांच्या सैनिकांत सर्वाधिक शेतकऱ्यांची मुलं होती, हे जाणून त्यांनी शेतकऱ्यांचे हित जपण्यास प्राधान्य दिलं. शेतकऱ्यांना कृषी क्षेत्रात प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने सर्वाधिक उत्पन्न काढणाऱ्या शेतकऱ्यांना पुरस्कार देऊन ते गौरवित असत. तर अल्प भूधारक शेतकऱ्यांना शिवकाळात मोफत बी बियाणे पुरविली जायची.तसेच शेतसारा किफायतशीर प्रमाणात आकारला जायचा. पडिक जमिनीची मशागत करणाऱ्या शेतकऱ्यांना राज्याकडून अर्थ सहाय्य दिलं जायचे. दुष्काळग्रस्त परिस्थितीत शेतकऱ्यांना शेतसारा माफ केला जात असे. वृक्ष तोड करू नये, असे कडक आदेश शिवरायांनी राज्यात काढले होते. शिवबा हे पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करण्यास अग्रक्रम देत असत. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली तर, राज्याला संपन्नता येईल, असे त्यांचे ठाम मत होते. शेतकऱ्याच्या पिकाच्या देठाला सुद्धा हात लावायचा नाही, असे सक्त फर्मान त्यांनी काढले होते. शेती हा हिंदवी स्वराज्याचा पायाभूत उद्योग आहे, या पार्श्वभूमीवर युद्ध काळात उभ्या पिकांची नासाडी करणे, हा दंडनीय अपराध मानला जायचा. या सर्व गोष्टी पाहिल्यावर शिवछत्रपती हे शेतकऱ्यांचे कैवारी असल्याचे निष्पन्न होते.

मोगल, आदिलशहा यांच्या तुलनेने सैन्यदल व युद्ध सामग्री कमी असूनही शिवबाने गनिमी कावा या युद्ध तंत्राचा अचूक प्रयोग करून शत्रूपक्षांना नामोहरम केलं. वास्तवात शिवरायांचे युद्धनैपुण्य अद्वितीय होतं. अफजलखानाचा वध, सुरतेची लूट, आग्राच्या नजरकैदेत असताना मिठाईच्या पेटाऱ्यातून केलेली सुटका, शाहिस्तेखान वरील हल्ला, कोंढाण्याचा विजय या सर्व ऐतिहासिक घटनांमधील यश हे शिवबाच्या गनिमी काव्याचे फलित होय. राज्याची मदार ही गडकिल्ल्यांवर आहे, हे जाणून शिवछत्रपतींनी राजगड, शिवनेर, पुरंदर, पन्हाळा, सिंहगड, विशालगड, प्रतापगड आदी किल्ले, कोट, जंजिरे उभारून राज्याची तटबंदी मजबूत केली. शिवकालीन राज्यव्यवस्था अत्यंत शिस्तबद्ध होती.

# सेना-राष्ट्रवादी कुरघोडी

गेल्या काही दिवसांत रायगड जिल्ह्यातील राजकारण शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन राज्याच्या महाविकास आघाडीमधील दोन प्रमुख घटक पक्षांभोवती फिरत आहे. दोनही वेगवेगळ्या विचारांचे हे पक्ष राज्यात स्थापन झालेल्या सरकारनंतर एकत्र आले. मात्र सुरुवातीपासूनच या दोन्ही पक्षाच्या नेत्यांचे आपापसातील संबंध ताणलेलेच होते. जिल्ह्यात तीन-तीन आमदार असल्याने कोकणातून आपल्यालाच मंत्रीपद मिळेल असा विश्वास असताना एकमेव आमदार असलेल्या राष्ट्रवादीच्या वाट्याला राज्यमंत्रीपद गेल्यानंतर शिवसेनेची आग झाली. हा संताप साहजिकच होता. त्यावर पुन्हा एकदा शिवसेनेचा विरोध डावलून पालकमंत्रीपद देखील राष्ट्रवादीच्या अदिती तटकरे यांनाच बहाल करण्यात आले. त्यामुळे बंड केलेल्या तीनही आमदारांना पक्षश्रेष्ठींनी समजूत घालत थंड केले. त्यानंतर अडीच वर्षे धुसफुसत जात असताना मध्येमध्ये या दोन्ही नेत्यांमध्ये संघर्षाची ठिणगी उडत असल्याचे पहायवास मिळत होते. त्याच ठिणगीचा वणवा लागला तो नगरपंचायतीच्या निवडणूकीच्या निमित्ताने. प्रत्येक वेळी पालकमंत्री डावलत असल्याने धुमसत असलेल्या असंतोषाला आ. भरत गोगावले यांच्या नेतृत्वाखाली तोंड फुटले. माणगावमध्ये पत्रकार परिषदेत पालकमंत्री हटावचा नारा दिल्यानंतर काल अलिबागमध्ये संपूर्ण जिल्हा शिवसेनेची बैठक घेऊन एकमुखाने ठराव घेत पालकमंत्री बदलण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. राष्ट्रवादीकडून देखील तितक्याच जोरदार शिवसेनेचा समाचार घेतला जात असला तरी सुनील तटकरे वा पालकमंत्री अदिती तटकरे यांनी यावर काहीच वक्तव्य केलेले नाही. मात्र या दोन पक्षातील आपापसातील कुरघोडी आता चव्हाट्यावर आल्या असून टोकाला गेलेले वाद मिटण्याची लक्षणे दिसत नाहीत. या दोन पक्षातील वादांचा परिणाम जिल्ह्याच्या विकासावर होऊ नये इतकीच अपेक्षा असून लवकरच यावर मार्ग काढण्याची गरज आहे.

वारा-वारा

भारत राजणकर

# सरेभाग ग्रामस्थांची फरफट

रस्ता हा जनतेचा मुलभूत हक्क आहे. मात्र बांधकाम विभागातील भ्रष्टाचार, टक्केवारी या साऱ्यामुळे आज या मुलभूत हक्कांपासून वंचित राहण्याची वेळ जनतेवर येत असते. पेण तालुक्यातील वाशी-सरेभाग रस्त्याचे काम ठेकेदाराच्या दिरंगाईने रखडल्याने सदर रस्त्याच्या कामासाठी ग्रामस्थांना उपोषणाचे हत्यार उपसण्याची वेळ ओढवली आहे. वाशी ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील वाशी सरेभाग हा रस्ता प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत सन २०१८ मध्ये मंजुर होऊन त्या रस्त्याच्या कामाचा ठेका १८ एप्रिलमध्ये व्ही.एस. कन्स्ट्रक्शन, खोपटा- उरण या कंपनीला देण्यात आलेला होता. सदरचे काम पूर्ण करण्याची मुदत १२ महिने इतकी होती. काम सुरू करून दिलेली मुदत संपून २१ महिने अधिक झाले तरीही ठेकेदाराने आत्तापर्यंत अवघे ३० टक्क्याच्या जवळपास इतकेच काम केलेले आहे. ठेकेदाराने आतापर्यंत केलेले काम अतिशय निकृष्ठ दर्जाचे असून, काम पूर्ण होण्यापूर्वीच हा रस्ता अनेक ठिकाणी खचला आहे. वाशी सरेभाग येथील रस्त्याच्या कामाची लांबी ४/६५० कि.मी. इतकी आहे व हे काम करण्यास हा ठेकेदार सक्षम असल्याची खात्री न करता त्याला हे काम दिल्याचे स्थानिक ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या कामात दोन पुलांचा समावेश असून या ठेकेदाराने एकाही पुलाचे काम अद्याप सुरू केलेले नाही. लाकडी तरंगता साकव (पूल) तयार केला असून हा साकव सद्यस्थितीत मोडकळीस आला आहे. यावरुन रहदारी करतांना कधीही अपघात होऊन जिवीतहानी होऊ शकते. रस्त्याचे काम सुरू झाल्यामुळे व या नवीन रस्त्यावरून जाणे येणे केल्याने जुने पारंपारिक मार्ग बंद झाले आहेत. त्यामुळे अस्तित्वात असलेल्या याच मार्गावरून जीव धोक्यात घालून सरेभाग गावात जाणाऱ्या व येणाऱ्या ग्रामस्थांना प्रवास करावा लागत आहे. रस्ता व पुलाअभावी गेली अनेक वर्ष ग्रामस्थांना खूप मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागत आहे. रस्त्यासारख्या मुलभूत गरजेसाठी आजही जर उपोषण करण्याची वेळ जनतेवर येत असेल तर विकास तरी कशाला म्हणायचे अशी बोलायची वेळ आली आहे. त्यामुळे अधिकारी वर्गाने तातडीने यावर मार्ग काढून रस्त्याचे काम सुरु करावे इतकेच!



## भगवद्गीता

या ठिकाणी भगवंत अर्जुनाला उपदेश देतात की, त्याने आपले वृद्ध पितामह आणि गुरु यांच्या देह-स्थित्यंतरामुळे शोक करु नये. त्यापेक्षा धर्मयुद्धात त्यांच्या शरीराचा वध करुन विविध शारीरिक कर्मांच्या भोगातून त्यांना मुक्त करण्यात त्याने आनंद मानला पाहिजे. यज्ञवेदीवर किंवा योग्य रणभूमीवर जो मनुष्य आपले जीवन समर्पित करतो तो शारीरिक कर्मभोगांतून तात्काळ मुक्त होतो आणि जीवनातील उच्चतर स्तरावर त्याची उन्नती होते. यास्तव अर्जुनाने शोक करण्याचे काहीच कारण नव्हते.

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ।।२३।।

न- कधीच नाही; एनम्- हा आत्मा; छिन्दति- कापून तुकडे तुकडे करणे; शस्त्राणि- शस्त्रे; न- कधीच नाही; एनम्- हा आत्मा; दहति- जाळणे शक्य आहे; पावकः- अग्नी; न- कधीच नाही; च- सुद्धा; एनम्- हा आत्मा; क्लेदयन्ति- भिजविणे शक्य आहे; आपः- पाणी; न- कधीच नाही; शोषयति- कोरडा किंवा शुष्क पडतो; मारुतः- वारा.

या आत्म्याचे कोणत्याही शस्त्राद्वारे तुकडे करता येत नाहीत, अग्नीद्वारे त्याला जाळता येत नाही, पाण्याद्वारे त्याला भिजविता येत नाही तसेच वाऱ्याने त्याला सुकविताही येत नाही.

तात्पर्यः तलवारी, अग्निशस्त्रे, वर्षाअस्त्रे, चक्रीवादळ इत्यादी जीवात्म्याला मारण्यात असमर्थ आहेत. आधुनिक अग्निवर्षाव करणाऱ्या शस्त्रांव्यतिरिक्त पूर्वीच्या काळी पृथ्वी, जल, वायू, आकाश इत्यादींपासून बनलेली विविध प्रकारची पुष्कळ शस्त्रास्त्रे होती. आधुनिक युगातील अण्वस्त्रांची वर्गवारीसुद्धा अग्निशस्त्रांमध्ये केली जाते, परंतु प्राचीन काळी निरनिराळ्या प्रकारच्या भौतिक मूलतत्वांपासून बनविलेली इतर शस्त्रास्त्रे होती. अग्नि-शस्त्रांचा प्रतिकार जलास्त्रांनी (वरुणास्त्र) केला जात असे, पण अशी वरुणास्त्रे आधुनिक विज्ञानाला ज्ञात नाहीत. तसेच आधुनिक वैज्ञानिकांना पवनास्त्रांचेही ज्ञान नाही. असे असले तरी आत्म्याचे कापून तुकडे करता येत नाहीत तसेच विविध प्रकारच्या कितीही आधुनिक शस्त्रांद्वारे त्याचा संहारही होऊ शकत नाही.

जीवात्मा केवळ अज्ञानामुळे कसा उत्पन्न झाला आणि नंतर तो मायाशक्तीने कसा प्रभावित झाला याचे स्पष्टीकरण मायावादी देऊ शकत नाही. व्यक्तिगत जीवात्म्याचे मूळ परमात्म्यापासून तुकडे करुन त्यांना अलग करणे शक्य नाही; खरे तर व्यक्तिगत जीवात्मे हे परमात्म्यापासून नित्यच वेगळे असलेले अंश आहेत. जीवात्मे हे सनातन अणुरुप अंश असल्यामुळे ते मायाशक्तीने प्रभावित होणे साहजिकच आहे. ज्याप्रमाणे अग्नीच्या ठिणग्या गुणात्मकदृष्ट्या अग्नीप्रमाणेच असल्या तरी अग्नीपासून अलग झाल्यावर विझतात त्याप्रमाणे जीवात्मेही भगवंतांच्या सानिध्यातून विभक्त होतात. वराहपुराणात जीवात्म्यांचे वर्णन भगवंतांपासून वेगळे झालेले अंश असे केले आहे आणि शाश्वतरित्या हे जीवात्मे अंशच राहतात, असे भगवद्गीताही सांगते. म्हणून भगवंतांनी अर्जुनाला दिलेल्या शिकवणुकीवरुन स्पष्ट होते की, मायेतून मुक्त झाल्यानंतरही जीवात्म्यांचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व हे टिकून राहते. श्रीकृष्णांकडून ज्ञानप्राप्ती झाल्यावर अर्जुन मुक्त झाला; परंतु तो श्रीकृष्णांशी कधीच एकरुप झाला नाही.

अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च ।
नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः ।।२४।।

अच्छेद्यः- न तुटणारा; अयम्- हा आत्मा; अदाह्यः- न जळणारा; अयम्- हा आत्मा; अक्लेद्यः- अविद्राव्य किंवा न विरघळणारा; अशोष्यः- न सुकणारा; एव- निश्चित; च- आणि; नित्यः- शाश्वत; सर्व-गतः- सर्वव्यापी; स्थाणुः- न बदलणारा; अचल- निश्चल; अयम्- हा आत्मा; सनातनः- शाश्वत तसाच राहणारा.

(क्रमशः)

(भगवद्गीता स्पर्धा माहिती पान क्रमांक ८ वर)


# भारतीय मुद्रण व्यवसायाचे आद्य जनक; छत्रपती शिवाजी महाराज

सुधाकर लाड

**गनिमी काव्याचे आद्य जनक, भारतीय आरमाराचे आद्य जनक, कम्युनिझम तत्वज्ञानाचे आद्य जनक, रेनवॉटर हार्वेस्टिंग योजनेचे आद्य जनक असलेल्या विश्ववंद्य, बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराजांनी १६७४-७५ साली युरोपीयनांकडून मुद्रणयंत्र घेऊन देवनागरी लिपीत मुद्रणखिळे बनवून काही संस्कृत ग्रंथांची छपाई केली होती असा उल्लेख इतिहासातील साधनात आढळून येतो. (संदर्भ : दि प्रिंटींग प्रेस इंडिया इट्स बिग्रिंस एण्ड अर्ली डेव्हलपमेंट. ए.के. प्रियोलकर मुंबई मराठी संशोधन मंडळ, मुंबई इ.स. १९५८ पृष्ठ ३०-३२) भारतात छापखाना सुरू करणारे छत्रपती शिवाजी महाराज हे भारतीय मुद्रण व्यवसायाचे आद्य जनक आहेत म्हणूनच भारतातील मुद्रण व्यवसाईकांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे सदैव ऋणी राहिले पाहिजे!**

कागद आणि मुद्रणाच्या शोधामुळे जगात क्रांती झाली. सुरुवातीला मुद्रण एक कला होती. आज मुद्रणतंत्र विकसित झाले आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात मुद्रण कलेला विशेष महत्त्व आले आहे. मुद्रणकला जगभरातल्या माणसांच्या जीवनातील एक अविभाज्य घटक झाली आहे. कागद, कापड, कातडी, पत्रा, प्लॅस्टिक इत्यादींवर रंगद्रव्याच्या सहाय्याने योग्य तो दाब देवून अक्षरे किंवा चित्रे उमटविणे, त्याच्या प्रति काढणे यास 'मुद्रण' म्हणतात.

इ.स. ८६८ मध्ये चीनमध्ये पहिल्यांदा 'हीरकसूत्र' हे पुस्तक मुद्रित झाले. कागदाचा शोधही चीनमध्येच लागला. १४व्या शतकात चीनमुळे युरोपात कागद निर्मितीची कला पोहचली. जर्मनीतील जोहान्स गुटेबर्ग याने इ.स. १४३६ ला मुद्रणाचा शोध लावला. मुद्रणाच्या अक्षरांसाठी चिकणमाती, लाकूड, शिसे यांचा वापर त्याने केला. जोहान्स गुटेबर्ग



याचा जन्म जर्मनीमध्ये इ.स. १३९८ मध्ये झाला. तो सुवर्णकार होता. त्याने धातूपासून अक्षरांचे खिळे तयार केले आणि जर्मनीतील मेंझ या शहरात स्वत:चे मुद्रणालय सुरू केले. त्यामुळे जोहान्स गुटेबर्गला मुद्रणाचा जनक म्हणून ओळखले जाते. गुटेबर्गने इ.स. १४५६ मध्ये त्याच्या मुद्रणालयात बायबलची छपाई केली. धातुची अक्षरे, कागद आणि छपाईसाठी लागणाऱ्या शाईसाठी मेंझ शहर प्रसिद्ध होते.

इंग्लंडमध्ये विल्यम कॅक्स्टनने मुद्रणालयाची स्थापना केली. इ.स. १४५७ पासून रंगीत छपाईला सुरूवात झाली. 'स्टिमिंगप्रेस' म्हणजे मुद्रणतंत्रात प्रतिमांचा वापर होऊ लागला. युरोप, अमेरिका, अशिया आणि आफ्रिका खंडातील देशांत मुद्रणालयांची स्थापना झाली. इ.स. १४९८ मध्ये वास्को-द-गामा हा धाडसी पोर्तुगीज दर्यावर्दी केरळमधील कलिकत बंदरात उतरला. त्यानंतर पोर्तुगीजांनी गोव्यात पहिले मुद्रणालय सुरू केले.

कुस्तामांती या युरोपीयन माणसाने इ.स. १५५६ मध्ये गोव्यात पहिले मुद्रणालय सुरू केले आणि ग्रंथ, धार्मिक साहित्याची छपाई सुरू केली. त्याचवेळी भारताच्या पूर्व किनारपट्टीवर इंग्रज व फ्रेंचांनी मुद्रणालयांची स्थापना करून छपाई करण्यास सुरूवात केली. भारतीय भाषेत मुद्रणखिळे तयार करण्यात येऊ लागले. चार्लस् विल्किन्स या इंग्रज माणसाने देवनागरी लिपीत मुद्रणखिळे तयार केले. भारतातील छत्रपती शिवाजी महाराज यांचा अपवाद सोडता तत्कालीन राजे, महाराजांनी मुद्रण व्यवसायाकडे दुर्लक्ष केले होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी इंग्रज, फ्रेंच, डच, पोर्तुगीजांकडूनही युरोपातील मुद्रण व्यवसायाची माहिती करून घेतली आणि विज्ञानवादी छत्रपती शिवाजी महाराजांनी छपाई करणारे आधुनिक मुद्रणतंत्रज्ञान स्वराज्यात आणण्याचा निश्चय केला होता. पुढे छत्रपती शिवाजी महाराजांनी सूरत जिंकल्यानंतर युरोपीयनांकडून छपाई करणारे मुद्रणयंत्र विकत घेतले. सूरतमध्ये राहणाऱ्या गुजराथी व्यापारी भीमजी पारीख यांच्याकडे हे मुद्रणयंत्र छत्रपतींनी दिले होते. या मुद्रणयंत्रावर कलकत्ता येथे तयार केलेल्या धातूच्या अक्षरांच्या मदतीने काही संस्कृत ग्रथांची छपाई करण्यात आली होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात ख्रिस्ती वाङ्मयही निर्माण झाले. 'फ्रान्सिवाद द गमारिस' या ख्रिस्ती ग्रंथकाराने बायबलवर आधारित ग्रंथ याच काळात लिहिला. त्या आधी 'मिनबेल डी. अलमेडा' याने लिहिलेले 'सेंट लोरेन्स' या ख्रिस्ती संताचे चरित्र इ.स. १६५८ मध्ये गोव्यात छापले गेले. स्वत: छत्रपती शिवाजी महाराजांनी छपाई करण्याकरिता छपाईयंत्र आणण्याचे उल्लेख इतिहासातील साधनात सापडतात. इंग्लंडमध्ये इ.स. १६६६ मध्ये 'लंडन गॅझेट' हे जगातले पहिले वृत्तपत्र सुरू झाले.

छत्रपतींचा खरा इतिहास महाराष्ट्रातीलच नव्हे तर, संपूर्ण भारतातील लोकांसमोर आला तर विज्ञानवादी, आधुनिक विचारांच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासातून भारताचे उज्ज्वल भवितव्य घडविण्याची भारतातील लोकांना प्रेरणा मिळेल.

**(लेखक पत्रकार/इतिहास अभ्यासक आहेत. ९२२४२३२९६३)**

# पळसगाव धनगरवाडीचा पाणीप्रश्न मिटला

## पालकमंत्री अदिती तटकरेंचे यशस्वी प्रयत्न

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत गांगवली हद्दीतील पळसगाव धनगरवाडी येथील पिण्याच्या पाण्याच्या समस्येला ग्रामस्थांना तोंड द्यावे लागत होते. पालकमंत्री अदिती तटकरे यांनी येथील पाणीपुरवठा योजनेसाठी नऊ लाखांचा निधी उपलब्ध करुन हा पाणीप्रश्न कायमचा निकाली लावला आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

यासाठी पळसगाव धनगरवाडीमधील राष्ट्रवादी कॉ. पक्षाचे कार्यकर्ते सुरेश ढवळे, अनंत ढवळे व ग्रामस्थ यांनी राष्ट्रवादी कॉ. पक्षाचे महाड, पोलादपूर, माणगाव विधानसभा अध्यक्ष बाबु खानविलकर यांच्याकडे गावातील पाणीसमस्येचा प्रश्न मांडला होता. त्यांनी तातडीने हा प्रश्न पालकमंत्री अदिती तटकरे यांच्याकडे मांडला. त्यांनी तात्काळ नऊ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून पाण्याचा प्रश्न मार्गी लावला, अशी माहिती राष्ट्रवादी पक्षाचे कार्यकर्ते सुरेश ढवळे, अनंत ढवळे यांनी प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकातून दिली. खा. सुनील तटकरे यांनी कडापूर ते जोर या रस्त्याचे काम व होडगाव ते कुंभारवाडी, साळवे रस्त्याचे कामही लवकरात लवकर मार्गी लावू, असे निजामपूर येथील सभेत सांगितले होते.



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Estimated cost |
|---|---|---|
| Tend-35/ 7000022264 | Hiring of vehicle for PID Testing Unit team for the period of one year under EHV (O&M) Circle, Panvel. | Limited to Rs. 6.00 Lakhs |

EMD 1% of estimated cost & Tender fee Rs.500/- + GST. **Submission of bids from 18.02.2022 to 25.02.2022 up to 11:00 hrs,Opening date:- 25.02.2022 @ 11:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** The Executive Engineer (Adm.)
Tel. No. 022-27459625. Mob No 9167026141

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकाकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेली आहेत.

**मौजे-हालिवली, तालुका-कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| सुर्याजी मालु ठाणगे | ४० | ८/३ | ०-१३-७० | ०-१७ |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तद्ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्यूपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि.१९/०२/२०२२

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड.स्वप्निल बाबूराव देशमूख**
पत्ता.मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं.२४,
डी.विंग, मुद्रे बुद्रक, ता.कर्जत जि.रायगड
मो.९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

### ग्राम पंचायत झोतिरपाडा ता.पेण.जि.रायगड
### जाहीर निविदा सूचना
### अल्प मुदतीची निविदा सूचना

ग्राम पंचायत झोतिरपाडा, ता.पेण, जि.रायगड येथे ग्रामनिधी अंतर्गत असलेल्या खालील कामांकरिता निविदा जास्तीत जास्त इच्छुक ठेकेदारांसाठी बंद लिफाफा पध्दतीने मोहरबंद निविदा सुट्टीचे दिवस वगळून मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निविदा किमंत | निविदा स्वीकारण्याची अंतिम दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. भास्कर हरिश्चंद्र कोळी ते श्री. संतोष रामचंद्र कोळी यांच्या आवारा पर्यत भुयारी गटार बांधणे. | २,४९,७६६/- | २,४९८ | १०० | १८/०२/२०२२ ते २५/०२/२०२२ |
| २. | श्री. अनिल हरी कुथे ते श्री.राघो हाशा कुथे यांच्या घरापर्यत पेवर ब्लॉक बसविणे. | १,४१,६७०/- | १,४१७ | १०० | -//- |
| ३. | श्री. अनिल हरी कुथे ते इ.जि.मा.५२ पुलापर्यत भुयारी गटार बांधणे. | २,४८,९८४/- | २,४९० | १०० | -//- |
| ४. | ग्रामपंचायत बेणसे स्वागत कमानी ते ग्राम पंचायत झोतिरपाडा कार्यालयापर्यत संरक्षण भिंत बांधणे. | १,५०,३९३/- | १,५०४ | १०० | -//- |
| ५. | मालती खंडू कुथे ते मेन गटारापर्यत भुयारी गटार बांधणे. | १,३२,२८०/- | १,३२३ | १०० | -//- |
| ६. | ग्राम पंचायत झोतिरपाडा कार्यालय ते चिंच विहीरीपर्यत संरक्षण भिंत बांधणे. | २,१७,८६४/- | २,१७९ | १०० | -//- |
| ७ . | सौ. संगिता नरेश पाटील ते इ.जि.मा. ५२ पुलापर्यत रस्त्याला संरक्षण भिंत बांधणे. | २,४७,२०१/- | २,४७२ | १०० | -//- |
| ८. | श्री.बाळाराम महादेव पाटील ते श्री. रुपेश नारायण पाटील यांच्या घरापर्यत पेवर ब्लॉक बसविणे. | ३,५०,६१९/- | ३,५०६ | १०० | -//- |
| ९. | ग्राम पंचायत झोतिरपाडा हद्दीतील हनुमान मंदिर येथे शेड बांधणे. | ४४,६६६/- | ४४७ | १०० | -//- |
| १०. | श्री.धर्मा नारायण कुथे ते विहिरीपर्यत संरक्षण भिंत बांधणे. | १,४३,१०६/- | १,४३१ | १०० | -//- |
| ११. | दत्त मंदिर ते श्री.मनोहर पुंडलिक पाटील यांच्या घरापर्यत पेवर ब्लॉक बसविणे. | १,६०,१०७/- | १,६०१ | १०० | -//- |
| १२. | जाखमाता मंदिर सभा मंडपाला गोटा लादी बसविणे. | २,३९,७३२/- | २,३९७ | १०० | -//- |

**अटी व शर्ती पुढीलप्रमाणे:**
१) कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पाहायला मिळतील, आवश्यक फी भरल्यास अंदाजपत्रकीय प्रत देण्यात येईल.
२) इसारा रक्कम रोख/ ऊऊ द्वारे स्वीकारली जाईल.
३) प्राप्त निविदा मासिक सभा दिनांक २८/०२/२०२२ रोजी ग्रा.प. येथे उपस्थित मा. उपसरपंच यांच्या हस्ते उघडण्यात येईल.
४) नोंदणीकृत ठेकेदारांस प्राधान्य देण्यात येईल. नोंदणकृत असल्यास पुरावे सादर करण्यात यावे.
५) सुरक्षा अनामत रक्कम देयकातून कपात करण्यात येईल. प्रत्येक देयकातून शासन नियमाप्रमाणे आयकर उपकाराची इतर कराची रक्कम कपात केली जाईल.
६) सदरील काम अंदाजपत्रकाप्रमाणे मा. उपभियंता साहेब व शाख अभियंता साहेब बांधकाम पंचायत समिती पेण यांजकडील तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली व देखरेखीखाली सदरील कामे करावयाचे असून काम समाधानकारक नसेल तर ते काम त्या स्थितीत थांबवून कार्यारंभ आदेश रद्द करण्याचा अधिकार ग्रा.पं. तीने राखून ठेवला आहे.
७) काम अंतिमरीत्या पूर्ण झाल्यानंतर कामाचा दर्जा पाहून सुरक्षा अनामत परत केली जाईल.
८) रू.५००/- बॉडवर करारनामा करावा लागेल.
९) कोणतीही १ अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. उपसरपंच यांनी राखून ठेवला आहे.
१०) निधी उपलब्ध प्राप्त झाल्यानंतर देयक दिले जाईल.

**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत, झोतीरपाडा**

**उपसरपंच**
**ग्रामपंचायत, झोतीरपाडा**

प्रो.जमा ५०/-
अर्जदारातर्फे ॲड.एम.बी.पडते

### जाहीर नोटीस
**अलिबाग येथील मे.दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो.रायगड-अलिबाग यांचे न्यायालयात**

दिवाणी चौकशी अर्ज नं.१५/२०२२
निशाणी नं.७/ड

श्रीमती सविता चंद्रकांत भिवंडे वगैरे २ — अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

अर्जदार नं.१ पती व अर्जदार नं.२ व ३ चे वडिल कै.चंद्रकांत पांडुरंग भिवंडे हे दि.१०/५/२०२१ रोजी मयत झाले असून कै.चंद्रकांत पांडुरंग भिवंडे अर्जदार नं.१ ही पत्नी व अर्जदार नं.२ व ३ मुले असे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार हे कायदेशीर वारस असल्याबाबत मे.कोर्टातून वारस दाखला मिळणेकरीता अर्ज दाखल केला आहे. सदरील दाखला अर्जदार यांचे पती कै.चंद्रकांत पांडूरंग भिवंडे यांचे बँक ऑफ इंडिया, शाखा अलिबाग येथे असलेल्या बचत खाते क्र.१२००१२१०००१०१३८ हे खाते क्रमांक असून सदर खात्यामध्ये रक्कम रू.८५,९२५/- एवढी रक्कम शिल्लक आहे व त्या रक्कमेवर होणारे व्याज अशी एकूण होणारी रक्कम अर्जदार वारस यांस मिळणे आवश्यक व गरजेचे आहे.

तरी कै.चंद्रकांत पांडूरंग भिवंडे यांचे पश्चात अर्जदारा व्यतिरिक्त कोणाचाही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी दि.०८/०३/२०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतःअगर आपल्या प्रतिनिधीमार्फत हजर राहून हरकत घ्यावी. सदर मुदतीत हजर राहून हरकत न घेतल्यास मे.कोर्टातून वारस दाखला देण्यासंबंधी योग्य ते हुकूम जारी करण्यात येतील. याची नोंद घ्यावी.

आज दि.११/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- **कनिष्ठ लिपीक दिवाणी न्यायालय व स्तर अलिबाग-रायगड**
(कोर्टाचा शिक्का)
सही/- **अधिक्षक दिवाणी न्यायालय, व स्तर, अलिबाग-रायगड**

अर्जदार तर्फे ॲड.मनाली सुनिल सतविडकर

### जाहीर नोटीस
**मुरूड येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे कोर्टात**

क्रि.चौ.अर्ज- ११/२०२२
श्री.विश्वास काशिनाथ गिरणेकर
वय २९ वर्षे, धंदा-शेती,
रा.मु.खारीकवाडा नांदगाव, पो.नांदगाव, — अर्जदार
विरूद्ध
सरकारतर्फे
ग्रुप ग्रामपंचायत उसरोली,
ता.मुरूड-जंजिरा, जि.रायगड — सामनेवाला

लोकांस कळविण्यात येते की,

सदर अर्जामधील अर्जदार यांचे आजोबा कै.महादेव चांगू गिरणेकर, यांचा मृत्यू दि.०५/१२/१९८९ रोजी राहत्या घरी म्हणजे मौजे खारीकवाडा नांदगाव पो.नांदगाव, ता.मुरूड-जंजिरा जि.रायगड येथे झाला असल्याची मृत्यू नोंद होण्याकरीता आदेश मिळवण्यासाठी मे.कोर्टाकडे अर्ज केलेला आहे. तरी सदर आदेश देणेस कोणाचीही तक्रार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २८/३/२०२२ पर्यंत मे न्यायालयात हजर राहुन आपली तक्रार नोंदवावी.

आज तारीख १७/२/२०२२ रोजी माझ्या सही शिक्यानिशी प्रसिद्ध केली.

सही/- **कनिष्ठ लिपिक दि.न्या.क.स्तर मुरूड**
(कोर्टाचा शिक्का)
सही/- **सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर मुरूड**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खाली नमुद केलेल्या जमिन मालकांनी त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खाली वर्णन केलेली जमिन मिळकत आमचे पक्षकार यांना विकत देण्याचे ठरविले असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-कुशिवली, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| संजय पांडूरंग कांबरी | ३८ | १ | ०-९८-२० पो.ख.०-१२-७० | ४.८८ |
| अरूण रामचंद्र गायकवाड लिलाधर घनश्याम गायकवाड | ३८ | २ | ०-०७-६० | ०.०६ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिएन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्कहितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहित धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

कर्जत
तारीख : १८/०२/२०२२
मोबा.९८२२९११२०५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**श्री.ए.पी.डिमेलो**
मु.भिसेगांव, ता.कर्जत, जि.रायगड

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे कोळगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. महादेव नारायण म्हात्रे, २) श्री. यशवंत नारायण म्हात्रे, ३) श्री. रमेश नारायण म्हात्रे, ४) श्री. लक्ष्मण नारायण म्हात्रे, ५) श्री. प्रताप नारायण म्हात्रे, ६) सुरेखा दत्तात्रेय म्हात्रे, ७) वर्षा दिलीप डाकी, ८) संजय शांताराम म्हात्रे, ९) राजश्री विनायक पाटील, १०) छाया जनार्दन म्हात्रे, ११) रूपेश जनार्दन म्हात्रे, १२) विशाखा विशाल पाटील व १३) सुप्रिया जनार्दन म्हात्रे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| कोळगाव | २९२ | ०-२२-०० पो. ख. ०-०२-०० ०-२४-०० | ५.९४ |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : १९/२/२०२२

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खाली नमुद केलेल्या जमिन मालकांनी त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खाली वर्णन केलेली जमिन मिळकत आमचे पक्षकार यांना विकत देण्याचे ठरविले असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-चांदई, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| संभाजी रामचंद्र कांबेरे | ३४ | ९ | ०-०७-१० पो.ख.०-००-८० | १.०६ |
| गुलाब वसंत कोळंबे | ३४ | ७ अ | ०-१७-७० पो.ख.०-०१-०० | १.६९ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिएन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्कहितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहित धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

कर्जत
तारीख : १८/०२/२०२२
मोबा.९८२२९११२०५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**श्री.ए.पी.डिमेलो**
मु.भिसेगांव, ता.कर्जत, जि.रायगड

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खाली नमुद केलेल्या जमिन मालकांनी त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खाली वर्णन केलेली जमिन मिळकत आमचे पक्षकार यांना विकत देण्याचे ठरविले असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-चेवणे, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| केशव मोहन कारावकर | २२ | ४ | १-०८-०० पो.ख.०-०८-०० | ०.७५ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिएन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्कहितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहित धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

कर्जत
तारीख : १८/०२/२०२२
मोबा.९८२२९११२०५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**श्री.ए.पी.डिमेलो**
मु.भिसेगांव, ता.कर्जत, जि.रायगड

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, मौजे.नालधे ता.कर्जत जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी कब्जेदारांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे नालधे ता.कर्जत जि.रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| मधुकर गणु ठोंबरे वगैरे ७ | १३ | १२ | ०-०५-०० | ०-०३ |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहाणार नाही.

कर्जत
ता.१९/०३/२०२२
मो.नं.९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड.समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं.५ अ, वृंदावन कॉम्प्लेक्स,
मुद्रे, ता.कर्जत, जि.रायगड

### जाहीर नोटीस

ने.ता.
२२/०३/२०२२

अर्जदारां तर्फे वकील
श्री.एन.जी.बदले
नि.नं.७/ड

**कर्जत येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

चौकशी अर्ज क्रमांक १५१/२०२१

१) श्रीमती.सुभद्रा पांडुरंग सोमणे.
२) सौ.छाया अनिल लोट
३) श्री.कन्हैया पांडुरंग सोमणे — अर्जदार
४) सौ.सुविधा सुनिल ठाकूर
५) श्री.प्रफुल्ल पांडुरंग सोमणे
सर्व रा.सुभद्रा निवास,
घर नंबर ११०, गुरूनगर, मुद्रे खुर्द,
ता.कर्जत, जि.रायगड
पिन कोंड- ४१०२०१.
विरूध्द
कोणीही नाही

सर्व तमाम लोकांस या सदरचे जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की,

सदरील अर्जदार क्रमांक १ यांचे पती व अर्जदार क्रमांक २ ते ५ यांचे वडील कै.पांडुरंग रामचंद्र सोमणे. रा.भालेवाडी, पो.गौळवाडी, ता.कर्जत, जि.रायगड पिनकोड ४१०२०१ हे दिनांक २४/०८/२०११ रोजी श्रीदेवी रूग्णालय, कल्याण-पश्चिम ता.कल्याण, जि.ठाणे येथे मयत झाल्याने त्यांचे पश्चांत त्यांचे कायदेशीर वारस म्हणून वरील सर्व अर्जदार हेच आहेत व तसा वारस दाखला मिळण्याचे कामी सर्व अर्जदार यांनी या मे.कोर्टात सदरचा अर्ज दाखल केला आहे.

तरी सर्व अर्जदारांचे मागणी प्रमाणे त्यांना वर नमूद केल्याप्रमाणे त्यांचे नांवे ते मयत कै.पांडूरंग रामचंद्र सोमणे. यांचे वारस असले बाबत वारस दाखला देण्यास कोणाही व्यक्तीची कोणत्याही प्रकारची हरकत घेण्याची असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याचे मुदतीत या मे.कोर्टात स्वतः किंवा त्यांचे वकिलामार्फत हजर होऊन रीतसर हरकती घेण्याच्या आहेत व या मुदतीत हरकती घेतल्या गेल्या नाहीत तर अर्जदार यांस त्यांचे मागणी प्रमाणे वारस दाखला देण्यास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत अजिबात नाही असे समजण्यांत व मानण्यांत येऊन मे.कोर्ट पुढील आवश्यक तो वारस दाखला देण्याचा हुकूम अर्जदाराचे लाभांत करील व मुदतीनंतर येणारी हरकत ग्राह्य धरली जाणार नाही याची सुस्पष्ट नोंद घ्यावी.

आज दिनांक १७/०१/२०२२ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

सही/- **कनिष्ठ लिपिक दिवाणी न्यायालय क.स्तर कर्जत**
(कोर्टाचा शिक्का)
सही/- **सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर कर्जत**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, मौजे. नालधे ता.कर्जत जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी कब्जेदारांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे नालधे ता.कर्जत जि.रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| यशवंत दुंदाजी जाधव | ५ | २ | ०-३४-०० | ०-२५ |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
ता.१९/०३/२०२२
मो.नं.९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड.समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं.५ अ, वृंदावन कॉम्प्लेक्स,
मुद्रे, ता.कर्जत, जि.रायगड

अर्जदारातर्फे ॲड कुणाल किशोर गावंड

### जाहीर नोटीस
**अलिबाग येथील मे.मुख्य न्यायदंडाधिकारी सो. यांचे कोर्टात**

फौजदारी चौकशी अर्ज २४/२०२२

श्री.सुनिल मुकुंद भगत,
रा.पाल्हे, नागाव,पो.नागाव — अर्जदार
ता.अलिबाग, जि.रायगड
विरूध्द
ग्रामपंचायत नागाव,
मु.पो.नागाव,
ता.अलिबाग, जि.रायगड — सामनेवाला

या जाहीर नोटीशीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

अर्जदार हे वरील पत्त्यावर राहत असून त्यांचे भाऊ कै. बाळकृष्ण मुकुंद भगत यांचे निधन दिनांक १४/०८/१९९६ रोजी मौजे पाल्हे, नागाव, पो.नागाव, ता.अलिबाग, जि.रायगड येथे वृद्धापकाळाने झालेले आहे.

अर्जदार यांना भावाचे निधनाची नोंद पंचायत सदरी केले बाबतची माहिती नसल्याने त्यांचेकडून त्यांचे भावाचे मृत्यूची नोंद शासन दरबारी करणे राहून गेलेले आहे. सबब अर्जदार यांनी मे.कोर्टात त्यांचे भावाचे मृत्यूची नोंद होवून मृत्यूचा दाखला मिळणेकरीता जन्म आणि मृत्यू नोंदणी कायदा चे कलम १३(३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे.

सदर अर्जाबाबत कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी दिनांक १४/०३/२०२२ रोजी सकाळी ११.०० वा मे.कोर्टापुढे सर्व पुराव्यानिशी स्वतः किंवा वकीलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे.

सदरहू मुदतीत जर सदरच्या अर्जास कुणाचीही कसलीही हरकत आली नाही तर मे.कोर्ट अर्जदाराच्या अर्जावर योग्य तो हूकूम करून अर्जदार यांनी नमूद केलेल्या तारखेचा मृत्यूचा दाखला देण्यात आदेश होईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १५/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी दिली.

सही/- **कनिष्ठ लिपिक**
(कोर्टाचा शिक्का)
सही/- **सहाय्यक अधिक्षक मुख्य न्याय दंडाधिकारी अलिबाग-रायगड**

कलासक्त



# रॉक-डिस्कोची खाशी ओळख निमाली...

**बप्पीदांच्या निधनाने 'याद आ रहा है', 'तम्मा तम्मा लोगे', 'प्यार बीना चैन कहा रे', 'बंबई से आया मेरा दोस्त' यासारखी उडत्या चालीची, तरुणाईला नाचायला लावणारी, डान्स फ्लोअर दणाणून सोडणारी गाणी आज मागे उरली आहेत. धडाकेबाज गाण्यांबरोबरच सोन्याच्या वेडानं वेगळी ओळख निर्माण करणारं, भारतीय संगीतविश्वाला रॉक तसंच डिस्को संगीताची खाशी ओळख करुन देणारं हे नाव काळाच्या पडद्याआड गेलं.**

श्रद्धांजली

मंजिरी ढेरे

संगीताला अथांग सागराची उपमा दिली जाते. ते अथांग, अवीट आणि बहुआयामी आहे. संगीतक्षेत्रात प्रत्येकाची अभिरुची वेगळी असते. प्रत्येक संगीतकाराच्या गाण्याचा पोत वेगळा असतो. पण असं बहुपेड असलं तरी सुश्राव्य, ताल-लयीचं भान असलेलं, कालसुसंगत असं संगीत कानसेनांना नक्कीच भावतं. या धर्तीवर बघायचं झाल्यास बप्पी लहिरींनी एक काळ गाजवला हे नाकारुन चालणार नाही. 'याद आ रहा है तेरा प्यार', 'तमा तमा लोगे', 'प्यार बीना चैन कहा रे', 'बंबई से आया मेरा दोस्त' यासारखी त्यांची उडत्या चालीची आणि तरुणाईला ठोक्यावर नाचायला लावणारी, डान्स फ्लोअर दणाणून सोडणारी गाणी याची साक्ष देतात. 'चलते चलते', 'डिस्को डान्सर', 'शराबी' यासारख्या चित्रपटांमधल्या त्यांच्या गाण्यांनी तुफान लोकप्रियता मिळवली हे एका पिढीला आठवत असेल. आपल्या धडाकेबाज गाण्यांबरोबरच सोन्याच्या वेडानं वेगळी ओळख निर्माण करणारं एक रंगतदार व्यक्तिमत्त्व म्हणजे बप्पी लहिरी अर्थात आलोकेश लहरी! प्रदीर्घ आजारानं त्यांची प्राणज्योत मालवली आणि भारतीय संगीतविश्वाला रॉक तसंच डिस्को संगीताची खाशी ओळख करुन देणारं हे नाव काळाच्या पडद्याआड गेलं. आता संगीतविश्व त्या जमान्यापासून बरंच पुढे निघून आलं आहे. मात्र बप्पीदाचं वेगळेपण कायमच स्मरणात राहील.

त्यांची आणि पॉप गायिका उशा उत्थुपची जोडी चांगली जमली. 'वन, टू चा चा चा', 'कोई यहां नाचे, नाचे', 'नाका बंदी', 'लॉकेट', 'मैं आ गई, सुपरस्टार...' अशी एकापेक्षा एक लोकप्रिय गाणी या दोघांनी दिली. उशाजींसोबत हरी ओम हरी, रांबा हो आणि कोई यहां नाचे नाचेसारखी सुपरहिट गाणी केल्याचा त्यांना अभिमान वाटायचा. बप्पीदा खऱ्या अर्थाने भारताचे डिस्को किंग होते. त्यांनी आपल्या संगीताच्या माध्यमातून डिस्को हा प्रकार भारतात प्रचलित केला. बप्पीदांनी सुमधुर गाणी दिली. चलते, चलते, माना हो तुम बेहद हसीं ही त्यांची गाणी मैलाचा दगड ठरली. त्यांनी हिंदी चित्रपट संगीताच्या क्षेत्रात बरंच काम करून ठेवलं आहे. त्यांचं संगीतक्षेत्रातलं योगदान कधीही विसरता येणारं नाही. बप्पीदांनी मोठ्या नायकांसाठी गाणी केली. त्यांच्या संगीताने सजलेले चित्रपट बॉक्स ऑफिसवर अपयशी ठरले तरी त्यातली गाणी लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचली आणि यातच बप्पीदांचं मोठेपण सामावलं आहे. बप्पीदा प्रयोगशील संगीतकार होते. त्यांनी उडत्या चालीच्या गाण्यांसोबतच सुमधूर गाणीही दिली. बप्पीदांनी 'रांबा हो'च्या वेळी पहिल्यांदा सिंथ ड्रम्सचा वापर केला होता. गाणं सुरू होण्याआधी या ड्रम्सचा एक वेगळाच आवाज कानी पडतो. बप्पीदांनी केलेला हा प्रयोग तुफान गाजला. हा अनोखा आवाज प्रत्येकाला आवडला. त्यानंतरच्या काळात प्रत्येक दिग्दर्शकाला, गायकाला आणि नायकाला आपल्या गाण्यांमध्ये हा आवाज असावा, असं मनापासून वाटायचं आणि अशा आवाजाची मागणी केली जायची.

या गाण्याच्या वेळी त्यांनी रिपिट मशीनही वापरलं होतं. म्हणजे प्रत्यक्षात मी 'रांबा हो' एवढंच म्हटलं होतं. त्यानंतरचे 'हो हो हो' हे शब्द या मशीनमधून बाहेर पडायचे. 'रिपिट मशीन' हा प्रकार पहिल्यांदा बप्पीदांनीच हिंदी चित्रपट संगीतात आणला. त्यांच्या या कल्पकतेचं खूप कौतुक झालं. बप्पीदा अशा पद्धतीचे नवनवे प्रयोग करायला कधीही कचरले नाहीत. 'रांबा हो' च्या यशानंतर प्रत्येकालाच अशा पद्धतीने गाणं करावंसं वाटू लागलं. रिपिट मशीनचा वापर करावासा वाटू लागला. त्यामुळे बप्पीदा हे चित्रपटसृष्टीतले 'ट्रेंड सेटर' होते, असं म्हणणं वावगं ठरणार नाही. बप्पीदा अत्यंत हसतमुख आणि साधे होते. त्यांचं संगीतावर खूप प्रेम होतं. गाणं आतून अनुभवायचं आणि मग गायचं असं त्यांचं म्हणणं असायचं. गाणं आधी आत्म्यापर्यंत पोहचू द्यायचं आणि मग सादर करायचं. अशा पद्धतीने समरसून गाणं म्हटलं की लोकप्रिय होणारच, असं ते म्हणायचे. त्यांचे हे शब्द मनावर अक्षरश: कोरले गेले. बप्पीदा थोर संगीतकार होते. मात्र दुर्दैवाने त्यांना फारसं गांभीर्याने घेतलं गेलं नाही. बप्पीदा म्हणजे गुणवत्तेची खाण होते. त्यांना अजून बरंच काही मिळायला हवं होतं. बप्पीदांच्या क्षमतेचा पूर्ण वापर झालाच नाही. त्यांना फक्त डिस्को गाण्यांपुरतं मर्यादित ठेवण्यात आलं. बप्पीदा नेहमीच सोन्याने मढलेले असायचे. हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक पैलू होता. यावरून काही वेळा त्यांची खिल्लीही उडवली जायची. पण बप्पीदांनी या सगळ्याकडे दुर्लक्ष केलं. ते मनस्वी आयुष्य जगले. बप्पीदांना रॉकस्टार व्हायचं होतं. आपलं हे स्वप्न त्यांनी पूर्णही केलं. बप्पीदा आयुष्यभर रॉकस्टारप्रमाणे वावरले.

हिंदी चित्रपटसृष्टीने त्यांना पुरतं ओळखलं नाही, याची खंत राहील. एवढी सुरेल गाणी देऊनही हिंदीतल्या संगीतकारांमध्ये बप्पीदांचं स्थान दुय्यमच राहिलं. खरं तर असं व्हायला नको होतं. बप्पीदांसारखा एवढा प्रतिभावान संगीतकार काहीसा उपेक्षितच राहिला, याचं खरंच खूप वाईट वाटतं. बप्पीदांनी गाण्यांची नक्कल केली असंही म्हटलं गेलं. प्रत्यक्षात नक्कल हा शब्द चुकीचा वाटतो. त्याऐवजी एखाद्या गाण्यातून किंवा संगीतातून प्रेरणा घेऊन रचना साकारली असं म्हणणं अधिक संयुक्तिक ठरतं. आज अनेक संगीतकारांनी अशा पद्धतीने अन्य रचनांमधून प्रेरणा घेतल्याचं दिसून येतं. 'हरी ओम हरी' आणि 'वन वे तिकिट' या दोन गाण्यांमध्ये साम्य असलं तरी आज 'वन वे तिकिट' विस्मृतीत गेलं आहे आणि 'हरी ओम हरी' आजही लोकप्रिय असून श्रोत्यांकडून नेहमीच या गाण्याची मागणी होत असते, हे विसरून चालणार नाही. बप्पीदांची गाणी सदाबहार आहेत आणि हीच त्यांच्या संगीताची जादू आहे. हाच बप्पीदांचा करिश्मा आहे. कोणत्याही संगीताची किंवा गाण्यांची कधीही तुलना होऊ नये, असं मला वाटतं. कारण शेवटी गाणं हे गाणं असतं. बोनी एम, अब्बा तसंच अन्य आंतरराष्ट्रीय कलाकारांनी संगीत सादर केलं आणि प्रचंड लोकप्रियता मिळवली. त्यांनी त्यांच्या पद्धतीचं संगीत सादर केलं. आज जगभरात या कलाकारांचे लाखो चाहते आहेत. बप्पीदांबाबतही असंच म्हणता येईल. बप्पीदांनी संगीत तयार केलं आणि ते जगभरात पोहोचलं. संगीताच्या माध्यमातून बप्पीदा जगभरातल्या चाहत्यांशी जोडले गेले. त्यांच्या रचना कालातीत आहेत, यात अजिबात शंका नाही.

बप्पीदा होते असं म्हणणं, त्यांचा उल्लेख भूतकाळात करणं क्लेशकारक आहे. बप्पीदांचं जाणं हे संगीतसृष्टीचं नुकसान आहे. ते आपल्यातून खूप लवकर निघून गेले. बप्पीदा या जगात नाहीत, यावर विश्वास ठेवणं खरंच खूप अवघड आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नाही. बप्पीदा शरीराने आपल्याला सोडून गेले असले तरी त्यांचं संगीत अमर आहे. गाण्यांच्या माध्यमातून ते आपल्यात राहणार आहेत. त्यांचा आवाज कायम आपल्या कानांमध्ये घुमत राहणार आहे. ■

तारे जमीं पर

अनिता पाध्ये

# ग्रेट भगवान दादा

***भारतीय चित्रपटसृष्टीमध्ये हिरो बनण्यासाठी देखणा चेहरा, पुरेशी उंची आणि चेहऱ्यावर एक प्रकारचा गोडवा असणं आवश्यक असतं, परंतु या गोष्टी नसताना देखील अभिनेता भगवान दादा भारतीय चित्रपटांचे नायक बनले, नुसते बनलेच नाहीत तर यशस्वी व लोकप्रिय नायक म्हणून त्यांनी नाव, पैसा, यश मिळवलं. भगवानदादा यांचा जन्म महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यामधील. १ ऑगस्ट, १९१३ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचं मुळ नाव भगवान अबाजी पालव होतं. कुस्तीची आवड असल्याकारणाने त्यांच्या नावापुढे 'दादा' हा शब्द जोडला गेला तो कायमचाच. भगवान दादांचे वडील मुंबईमध्ये गिरणी कामगार होते. चित्रपटात येण्यापूर्वी पोटापाण्यासाठी भगवान दादांनी मजूर म्हणून काम करण्यास सुरुवात केली. मात्र तरुण वयापासूनच त्यांचा अभिनय व चित्रपटांकडे ओढा होता.***



१९३० साली 'बेवफा आशिक' या मुकपटामध्ये भगवानदादांना विनोदी भुमिका करण्याची प्रथम संधी निर्माता सिराज अली हकीमनी दिली होती. परंतु चित्रपट यशस्वी होऊन देखील आठ महिने भगवानदादांना एकही चित्रपट मिळाला नव्हता. त्यानंतर त्यांना मिळालेल्या 'क्रिमिनल' या मूकपटापासुन खऱ्या अर्थाने भगवानदादांची अभिनय कारकिर्दीची सुरुवात झाली होती. त्यांचा पहिला बोलपट होता; १९३४ साली प्रदर्शित झालेला 'हिम्मत-ए-मर्दा. या सिनेमात त्यांच्यासह अभिनेत्री ललिता पवार होत्या. जबान, जिंदगी, बहादूर किसन, गुनेहगार, तुम्हारी कसम, जीते रहो आदि चित्रपटांमुळे भगवानदादा यशस्वी , लोकप्रिय अभिनता म्हणून प्रसिद्धीस आले. अभिनय करता करता भगवानदादांनी चित्रपट निर्मिती व दिग्दर्शनाचे तंत्र शिकण्यास सुरुवात केली. तसंच स्टंट फिल्मचे प्रख्यात दिग्दर्शक जी. पी. पवार यांच्याकडे ते सहाय्यक म्हणून देखील त्यांनी दिग्दर्शनाचे धडे घेतले. १९३८ मध्ये जी. पी. पवार यांच्यासह त्यांनी 'बहादूर किसान' हा चित्रपट दिग्दर्शित करत दिग्दर्शन क्षेत्रात पाऊल टाकत कमीत कमी खर्चात चित्रपट बनवण्याचे तंत्र भगवान दादांनी शिकून घेतले. दिग्दर्शनासोबतच 'स्टंटमॅन' म्हणून सुद्धा त्यांनी काम केलं. त्याचकाळात हिंदीसह काही तामिळ चित्रपटांमध्ये देखील त्यांनी अभिनय केला. १९३८ ते १९४९ या काळात त्यांनी सर्वसामान्य प्रेक्षकांसाठी लहान बजेटचे मनोरंजक स्टंट चित्रपटांचे दिग्दर्शन केलं. हॉलीवुडअभिनेता डगलस फेयर बँक्स हे भगवानदादांचे दैवत होते. डगलसच्या अभिनयाने प्रेरीत होऊन त्यांनी आपल्या चित्रपटांमध्ये बॉडी डबल ऐवजी स्वत: स्टंट करण्यास सुरुवात केली होती. त्यांनी केलेली स्टंट दृश्ये इतकी खरी वाटत असत की शोमॅन राजकपूर त्यांना इंडियन (भारतीय) डगलस या नावाने संबोधित करत असत. १९४९ साली 'भेदी बंगला' या पहिल्या भारतीय भयपटाची (हॉरर) निर्मिती भगवान दादांनी केली होती.

ललिता पवार भगवान दादांसह १९४२ साली 'जंग ए आजादी' या सिनेमातील एक प्रसंग चित्रित करत होत्या, त्यात भगवानदादांना ललिताबाईंना थप्पड मारायची होती, भगवानदादांनी इतक्या जोराने ललिताबाईंच्या चेहऱ्यावर चपराक मारली की त्या जमीनीवर पडल्या आणि त्यांच्या कानातुन रक्त वाहू लागले. बरेच दिवस उपचारासाठी ललिताबाईंना हॉस्पिटलमध्ये राहावे लागले. मात्र या घटनेमुळे त्यांच्या चेहऱ्याचा उजवा भाग पॅरेलाईझ होऊन त्यांचा उजवा डोळा बारीक झाला तो कायमचाच. त्यामुळे नायिका म्हणून ललिताबाईंची कारकिर्द संपुष्टात आली व त्यांना चरित्र व खलनायिकेच्या भूमिकांकडे वळावे लागले. मात्र या प्रसंगाची भगवानदादांना नेहमीच रुखरुख राहिली.

त्याच साली 'जागती पिक्चर्स' ही स्वत:ची चित्रपटसंस्था करुन भगवानदादश चित्रपट निर्मिती बनले तर १९४७ साली चेंबुरला एक जमीन खरेदी करुन भगवानदादांनी स्वत:च्या मालकीचा जागती स्टुडियो निर्माण केला. यावरुन भगवानदादा किती यशस्वी अभिनेता, दिग्दर्शक व निर्माता बनले होते याची वाचकांना कल्पना यावी. भगवानदादांची निर्मिती व दिग्दर्शन असलेल्या चित्रपटातील एका सीनमध्ये पैशांचा पाऊस पडत असं दाखवायचं होतं त्या दृश्यासाठी भगवानदादांनी खऱ्या चलनी नोटांचा वापर केला होता.

फार कमीजणांनी माहिती असेल की भारत पाक फाळणीच्या काळात भगवानदादांनी भायखळा नजीक भेंडीबाजार परिसरात राहणाऱ्या अनेक मुस्लीम कलाकार व तंत्रज्ञांना संरक्षण दिले होते. प्रामुख्याने स्टंट चित्रपटांची निर्मिती केल्यानंतर निर्माता-दिग्दर्शक व अभिनेता राज कपुर यांच्या सल्ल्यावरुन भगवानदादांनी १९५१ साली 'अलबेला' या चित्रपटाची निर्मिती केली. हा सिनेमा व यातील सर्व गाणी तुफान गाजली. या चित्रपटात अभिनयसह भगवानदादांनी दिग्दर्शन देखील केले होते. 'शोला जो भडके दिल मेरा धडके' या गाण्याने त्याकाळी तरुणाईला अक्षरशः वेड लावले. याशिवाय 'भोली सुरत दिल के खोटे', 'शाम ढले खिडकी तले तुम सिटी बजाना छोड दो' 'किस्मत की हवा कभी नरम..' ही गाणी देखील लोकप्रिय झाली. 'अलबेला' मधील अनोख्या नृत्यशैलीने भगवान दादांना प्रचंड लोकप्रियता मिळाली. नंतरच्या काळात स्टार बनलेले अमिताभ बच्चन, मिथुन चक्रवर्ती, गोविंदा हे कलाकार कायम भगवान दादांसारखे नृत्य करता यावे, म्हणून धडपडत राहिले. परंतु त्यांना कधीच दादांसारखे नृत्य करता आले नाही. माणसाकडे पैसा आला की त्याला आपल्याकडे अनेक गोष्टी हव्यात अशी इच्छा माणसाला होते. भगवानदादा देखील याला अपवाद नव्हते. त्यांना शेवरले मोटारींची खुप आवड होती. असं म्हंटलं जातं याच कारणामुळे भगवनादादांनी 'शेवरले' नावाच्या सिनेमामध्ये काम केलं होतं. त्यांच्याकडे सात मोटारी होत्या. प्रत्येक दिवशी शुटिंगसाठी स्टुडियोमध्ये जाताना ते नवी मोटार वापरत असत. केवळ मोटारीच नाहीत तर जुहूच्या समुद्र किनारी २५ रुम्सचा भव्य बंगला देखील दादांनी बांधला होता.

'अलबेला' हा सुपरहिट झाल्यानंतर भगवान दादांनी 'झमेला', 'रंगीला', 'भला आदमी', 'शोला जो भडके', 'हल्ला गुल्ला' आदि सिनेमांची निर्मिती केली. हे चित्रपट देखील 'अलबेला' प्रमाणे यशस्वी होतील अशी आशा त्यांना वाटत होती. परंतु हे सर्वच चित्रपट बॉक्स ऑफिसवर सपशेल पडले. लागोपाठच्या या अपयशाने निराश न होता भगवानदादांनी १९६५ साली 'भागम भाग' या चित्रपटाची निर्मिती केली आणि तो सिनेमा यशस्वी देखील ठरला. परंतु १९६६ मध्ये प्रदर्शित झालेला 'अलबेला' या चित्रपटाने त्यांना खुप मोठे अपयश पत्करावे लागले. दिग्दर्शक म्हणून भगवान दादांचा हा शेवटचा चित्रपट ठरला, या सिनेमाच्या अपयशामुळे त्यांनी दिग्दर्शन क्षेत्राला राम राम ठोकला.

पडलेल्या चित्रपटांच्या निर्मितीमध्ये भगवान दादांनी आपली सर्व बचत, पत्नीचे दागिने यांचा वापर केला होता. त्यातच भर म्हणजे त्यांना मद्य व जुगाराचा शौक जडला होता. अपयशी चित्रपटांमुळे त्यांच्या डोक्यावर इतके मोठे कर्ज झाले की ते कर्ज फेडण्यासाठी जुहू येथील भव्य बंगला, सर्व मोटारी विकून भगवान दादा पुर्वीच्या दादर टी. टी. येथील चाळीतील आपला दोन खोल्यांमध्ये रहायला गेले. एकेकाळी पार्ट्यांसाठी त्यांच्या बंगल्यामध्ये सिनेसृष्टीतील मंडळी जमा होत असत, परंतु दादा कफल्लक झाल्यानंतर कुणीही त्यांची दखल घेतली नाही. अपवाद फक्त अभिनेता सुनील दत्त, ओमप्रकाश, गीतकार राजेंद्रकृष्ण, संगीतकार सी. रामचंद्र व अभिनय सम्राट दिलीप कुमार यांचा. चित्रपटसृष्टीमध्ये नाव नाही, तर काम माणसाला जीवंत ठेवतं असं म्हणणाऱ्या भगवानदादांना या गोष्टीचा प्रत्यय येऊ लागला होता, उदरनिर्वाहासाठी एकेकाळच्या या लोकप्रिय, यशस्वी नायकाने चित्रपटांमध्ये सहाय्यक भूमिका तर कधी अगदी लहान-अर्थहीन भूमिका करण्यास सुरुवात केली. परंतु 'झनक झनक पायल बाजे', 'चोरीचोरी' व 'गेट वे ऑफ इंडिया' आदि ३-४ चित्रपट वगळता दादांना चांगल्या भुमिका कधी फारशा मिळाल्याच नाहीत. अनेक निर्माता-दिग्दर्शक भगवानदादांच्या या निकडीचा व व्यसनाचा फायदा घेत चित्रपटातील भुमिकेसाठी पैशांचा मोबदला न देता मद्याची बाटली देत असत. वयपरत्वे भगवानदादांनी चित्रपटात काम करणे बंद केले. परंतु भगवानदादांचं एक वैशिष्ट्य मी स्वत: बघितलं, अनुभवलं आहे की आपल्या श्रीमंतीच्या गोष्टी सांगताना ते जितके मनमोकळ्यापणाने, सहजपणे बोलत असत, तितक्याच सहजतेने ते आपल्या गरीबी विषयी बोलत असत, त्यांच्या बोलण्यात मला कधीच खंत किंवा निराशा जाणवली नाही. पुर्वी चित्रपटात काम करताना सेटवर आपल्या विनोदाने हसतखेळत वातावरण निर्माण करणारे दादा, चाळीतील दोन खोल्यांमध्ये देखील विनोद करत असत. एकदा त्यांच्याशी झालेल्या भेटीदरम्यान ते मला म्हणाले होते, तुला माहितीय का चित्रपटात जेव्हा कुणी खलनायक, नायिकेची अब्रु लुटायचा प्रयत्न करतो तेव्हा मला जरा बरं वाटतं. दादांचं ते वाक्य ऐकून मी थोडी गडबडलेच... माझ्या चेहऱ्यावरील संभ्रम त्यांनी ओळखला.

'कारण तर विचार मला..' दादा, म्हणाले होते..

'का आनंद होतो, सांगा बरं?' माझा प्रश्न

'अग, बाई, खलनायक जवळ आला की नायिका ओरडते, छोडो मुझे, भगवान के लिए मुझे छोडदो। हे वाक्य कलं की मी खुश होतो. भगवानदादा हसत म्हणाले होते.

वैभव, श्रीमंतीप्रमाणेच आर्थिक चणचण देखील मनापासुन स्वीकारणाऱ्या या अवलीयाने ४ फेब्रुवारी २००२ रोजी या जगाचा निरोप घेतला. ■

सहज सुचलं म्हणून...

विलास समेळ

# शंका




रात्री किती उशिरापर्यंत वाट पाहिली, पण तू आलीच नाहीस... शेवटी तसाच झोपलो. हे वाक्य कुणाचं असेल असं विचारलं तर, त्याची उत्तरं अनेक येतील. निरनिराळ्या शंका मनात उद्भवतील. अनेक तर्क कुतर्क लढवले जातील आणि त्यातून काहीतरी विचित्रच ऐकायला मिळेल. कारण माणसाचं मन हे शंकेखोर असतं. त्यामुळे असं होतं. खरं तर एका पित्यासमान सासऱ्याने आपल्या मुलीसमान सुनेला हे म्हटलं आहे.

दोन वर्षांपूर्वी पत्नीचं निधन झाल्यापासून पाठदुखीसाठी न चुकता सूनबाई तेल नि मलम लावून देते. परंतु काल रात्री नवऱ्याचा मित्र नि त्याची बायको जेवायला आल्यामुळे गप्पा गोष्टी करत जेवण झाल्यावर मागचा सारा पसारा आटपता आटपता बारा कधी वाजून गेले ते कळलंच नाही. तरीही सुनेने एकदा सासरेबुवांच्या खोलीत डोकावून पाहिलं, परंतु त्यांना झोप लागलेली पाहून तिने त्यांना उठवलं नाही.

अजय ना कधी बाबांशी मनमोकळे बोलला की, ना कधी त्यांची मनापासून चौकशी केली. त्यांना हवं नको ते आणून देण्याचं कर्तव्य मात्र पार पाडत होता. माणसाला सारं काही मिळालं तरी दोन गोड शब्दांसाठी तो कायम आसुसलेलाच असतो. त्याच्या बाबांचं नेमकं तेच झालं. त्याची आई गेली आणि बाबा एकटे पडले. घरात एखादं नातवंड असलं तरी तो मोठा विरंगुळा असतो. पण अजयला आपल्या करियरला महत्व द्यायचं असल्याने त्यांचं 'प्लॅनिंग' चालू होतं. या सर्वात दिलासा देणारी एकच गोष्ट होती, ती म्हणजे अजयची बायको, त्यांची सूनबाई! स्वत:च्या आई वडिलांसारखंच ती सासू सासऱ्यांवर प्रेम करायची. अजय हा एकुलता एक मुलगा. त्याला ना बहीण होती ना भाऊ. खूप लाडाकोडात वाढलेला. प्रत्येक गोष्ट स्वत:पुरतीच असल्याची त्याची भावना.

एका विचित्र अपघातात बाबांना कमरेला नि पाठीला जो मार लागला होता, त्यामुळे ते परावलंबी झाले होते. आई असेपर्यंत कसलाच काही प्रश्न नव्हता. अचानकपणे हृदयविकाराच्या झटक्याने तिचं जाणं बाबांना खूप लागलं. स्वत:ला मुलगी नसली तरी सुनेच्या रुपात आपल्याला मुलगी मिळाल्याचं त्यांना समाधान होतं नि त्याच हक्काने ते सुनेला काम सांगायचे आणि तीही ते करायची. वरील वाक्य हे त्या आपुलकीच्या भावनेतूनच आलं होतं. बोलण्यातील कारण नि त्याचा अर्थ समजून न घेता त्याचा कसाही अर्थ लावणे म्हणजेच शंका! परिस्थिती समजून घेतली तर अशा शंकांना वाव राहत नाही. तेव्हा आपलं मत प्रदर्शित करण्यापूर्वी फक्त एकदा शहानिशा करायला शिका. पहा खूप फरक पडेल. ■

८८७९००५८५८

कृषीवल
www.krushival.in
ग्लॅम वर्ल्ड
▶▶ शनिवार, दि. १९ फेब्रुवारी २०२२




**'मोहेंजोदाडो'मधून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलेली पूजा हेगडे दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत खूप व्यस्त आहे. तिने दक्षिणेकडच्या अनेक दिग्गजांसोबत काम केलं असून आता ती अभिनेता प्रभाससोबत 'राधेश्याम'मध्ये दिसणार आहे. या चित्रपटाबाबत पूजा खूप उत्सुक असून प्रभाससोबत काम करण्याचा अनुभव खूप चांगला असल्याचं तिने म्हटलं आहे.**

# पूजाचा आत्मविश्वास

पूजा हेगडेने 'मोहेंजोदाडो'मधून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं. तिला पदार्पणातच हृतिक रोशनसारख्या अभिनेत्यासोबत काम करण्याची संधी मिळाली. 'मोहेंजोदाडो' अपयशी ठरला. पण पूजाचा अभिनय प्रेक्षकांच्या लक्षात राहिला. पूजा हिंदीपेक्षा दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत जास्त व्यस्त असते. दक्षिणेकडच्या लोकप्रिय अभिनेत्यांसोबत काम करताना चित्रपटांमधून स्वत:चं अस्तित्व दाखवून देणं हे अभिनेत्रींपुढचं मोठं आव्हान असतं. फक्त शोभेची बाहुली बनून न राहता उत्तम अभिनय साकारून प्रेक्षकांच्या मनात स्थान मिळवणं आवश्यक असतं. पूजा नेहमीच हा समतोल साधण्याचा प्रयत्न करते. आत्मविश्वासाच्या बळावर आपण हे करू शकतो, असं पूजा सांगते. स्वत:ला सिद्ध करण्याचा आत्मविश्वास आतून येत असल्याचं तिचं म्हणणं आहे. पूजा पुढे सांगते, मी चित्रपटांसाठी बरीच मेहनत करते. माझ्या चित्रपटांचं डबिंग मीच करते. भाषा कठीण असली तरी मी थोडे प्रयत्न करते. माझ्या प्रयत्नांमुळे का होईना लोकांना माझ्या मेहनतीची जाणीव होईल, माझ्या कामाची ओळख पटेल. पूजा प्रभाससोबत काम करते आहे. प्रभाससोबत काम करण्याचा अनुभव ती शेअर करते. पूजा म्हणते, प्रभास खूप गमतीशीर आहे. सुरूवातीला तो लाजराबुजरा वाटतो. पण एकदा ओळख झाल्यावर तो खुलतो. मला त्याच्यासोबत काम करताना खूप मजा आली. खूप छान वाटलं. याच कारणामुळे चित्रपटात आमची केमिस्ट्री खूप छान जुळून आली आहे. यासोबतच पूजा विजयसोबत 'बिस्ट' हा चित्रपटही करते आहे. या चित्रपटाचीही बरीच चर्चा आहे.



# छोटासा ब्रेक

श्रद्धा कपूर सध्या कामात बरीच व्यस्त आहे. तिच्याकडे लव रंजनचा एक चित्रपट असून जाहिरातींची कामंही आहेत. त्यामुळे श्रद्धाची बरीच धावपळ सुरू आहे. मात्र या व्यस्त कार्यक्रमातून श्रद्धाने ब्रेक घेतला आहे. याला कारणही तसंच आहे. लव रंजन लग्न करतोय. या लग्नासाठी तिने कामातून विश्रांती घेतली आहे. श्रद्धाला लव रंजनच्या लग्नाला जायचं आहे. तिथे धमाल करायची आहे. दोन ते तीन दिवस ती लग्नाच्या मूडमध्ये असणार आहे. त्यामुळे श्रद्धालाही थोडा ब्रेक मिळणार आहे.

# अनुष्का लागली तयारीला

अनुष्का शर्मा मुलीच्या जन्मानंतर कमबॅकसाठी सज्ज झाली आहे. अनुष्का 'चकदा एक्सप्रेस'मधून रुपेरी पडद्यावर पुनरागमन करते आहे. या चित्रपटात अनुष्का क्रिक़ेटपटू झुल्लन गोस्वामीच्या भूमिकेत दिसेल. अनुष्काने भूमिकेची तयारी सुरू केली आहे. अनुष्काने व्यायामाला सुरूवात केली असून सोशल मीडियावर फोटोही अपलोड करते आहे. अनुष्कानेट नेहमीच फिटनेसवर भर दिला आहे. त्यामुळे क्रिकेटपटूच्या भूमिकेत शिरण्यासाठी तिला फार मेहनत घ्यावी लागणार नाही. या भूमिकेसाठी तिला विराटची मदतही होऊ शकते. अनुष्काला झुल्लनच्या भूमिकेत बघणं तिच्या चाहत्यांसाठी पर्वणीच असेल.



# 'बधाई दो'ची समाधानकारक कामगिरी



**कोरोनाचा प्रभाव कमी होऊ लागल्यानंतर चित्रपट चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होऊ लागले आहेत. सध्या चर्चा आहे ती 'बधाई दो' या चित्रपटाची.**

एका वेगळ्या विषयावर आधारित या चित्रपटाने पाच दिवसात १०.७९ कोटी रुपयांची कमाई केली असून ही कामगिरी समाधानकारक मानली जाते आहे. राजकुमार राव आणि भूमी पेडणेकर यांच्या 'बधाई दो'ने बॉक्स ऑफिसवर समाधानकारक कामगिरी केली आहे. या चित्रपटाने पहिल्या तीन दिवसात ७.८२ कोटी रुपये कमावले होते. सरत्या आठवड्यातल्या रविवारी चित्रपटाने ३.४५ कोटी रुपये गल्ला जमवला. यामुळे चित्रपटाच्या तीन दिवसांच्या कमाईचा आकडा ७.८२ कोटी रुपयांवर पोहोचला. समलैंगिकता या विषयावर आधारित असलेल्या या चित्रपटाचा आवाका अर्थातच मर्यादित आहे. त्यामुळे चित्रपटाच्या कमाईवर याचा परिणाम होणार यात अजिबात शंका नव्हती. याआधी आयुष्मान खुराना आणि वाणी कपूर यांच्या 'चंडीगड करे आशिकी'च्या बाबतीतही असंच घडलं होतं. मात्र 'बधाई दो'ला बॉक्स ऑफिसवर काहीसा संघर्ष करावा लागत आहे. व्हॅलेंटाईन्स डेला चित्रपटाने १.८५ कोटी रुपये कमावले. त्यानंतर मंगळवारी 'बधाई दो'ने १.६५ कोटी रुपये व्यवसाय केला. हा चित्रपट ठिकठाक कमाई करताना दिसत आहे. 'बधाई दो'ची एकूण कमाई २० कोटी रुपयांच्या आसपास राहील, अशी अपेक्षा व्यक्त होते आहे. तिकडे 'स्पायडर मॅन : नो वे होम'ने 'अवतार'च्या एकूण कमाईला मागे टाकलं असून आता तो अमेरिकेत सर्वाधिक कमाई करणारा तिसऱ्या क्रमांकाचा चित्रपट ठरला आहे. या चित्रपटाचा मागील दोन महिन्यांचा प्रवास स्वप्नवत राहिला असून या काळात त्याने अनेक विक्रम मोडित काढले आहेत. बॉक्स ऑफिस मोजोच्या म्हणण्यानुसार 'स्पायडर मॅन : नो वे होम'ने जगभरात १.८ अब्ज डॉलर्सची कमाई केली आहे. त्यापैकी ७६०.९८ दशलक्ष डॉलर्स स्थानिक बॉक्स ऑफिसवर तर १.०४ अब्ज डॉलर्स जागतिक बॉक्स ऑफिसवर कमावले आहेत. तिकडे 'अवतार'ने स्थानिक बॉक्स ऑफिसवर ७४९.७६ दशलक्ष डॉलर्स कमावले होते. 'स्पायडर मॅन : नो वे होम'ने कोरोनाकाळात एवढी कमाई केल्यामुळे अधिक कौतुक होताना दिसत आहे.

# प्यार के चर्चे



सेलिब्रिटींच्या प्रेमप्रकरणांची नेहमीच चर्चा होत असते. पुष्पामुळे चर्चेत आलेली अभिनेत्री रश्मिका मंदानाबद्दलही सध्या असंच घडतंय. 'पुष्पा'मधली श्रीवल्ली म्हणजे रश्मिका मंदाना घराघरात पोहोचली आहे. रश्मिका आणि दाक्षिणात्य स्टार विजय देवराकोंडा यांच्यात काहीतरी सुरू असल्याचं बोललं जात आहे. विजय आणि रश्मिका मुंबई आणि हैदराबादमध्ये एकाच जीममध्ये जातात. हे दोघं डिसेंबर महिन्यात डिनर डेटवर गेले होते. तसंच त्यांनी गोव्यात नव्या वर्षाचं स्वागत केल्याचंही बोललं गेलं. त्यामुळे रश्मिका आणि विजय यांच्यात खरंच काही शिजतंय का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. रश्मिका आणि विजय यांनी आपलं नातं उघड केलेलं नाही. पण मध्यंतरी रश्मिकाने प्रेमाबद्दलचे विचार मांडले होते. त्यामुळे तिने विजयला डोळ्यांसमोर ठेऊन हे वक्तव्य केलं आहे का, अशी खुसखुशीत चर्चा सुरू झाली आहे.

# स्टारकिड्‌सची वेगळी वाट



**बऱ्याच स्टारकिड्‌सनी आईवडिलांच्या पावलावर पाऊल टाकून अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवलं. मात्र बॉलिवूडमध्ये नाव कमावलेल्या सगळ्याच कलाकारांच्या मुलांना या झगमगाटाचं आकर्षण असतंच असं नाही. बऱ्याच स्टारकिड्‌नी वेगळा मार्गही निवडला आहे. ही मुलं आईवडिलांच्या सावलीतून बाहेर पडून स्वत:चं अस्तित्व निर्माण करत आहेत.**

जुही चावलाची मुलगी जान्हवी मेहता सध्या चर्चेत आहे. नुकत्याच झालेल्या आयपीएलच्या महालिलावादरम्यान ती कोलकाता नाईट रायडर्ससाठी खेळाडूंवर बोली लावताना दिसली. जान्हवी याआधीही लिलावात सहभागी झाली आहे. एका मोठ्या अभिनेत्रीची मुलगी असूनही जान्हवीला अभिनयात अजिबात रस नाही. १९ वर्षांच्या जान्हवीने लंडनमधून उच्च शिक्षण घेतलं असून तिला लेखनात करिअर करायचं आहे. विनोद खन्ना आणि कविता खन्ना यांचा मुलगा साक्षी खन्नाला अभिनय करायचा नाही. अर्थात त्याला बॉलिवूडची ओढ असली तरी तो निर्मिती क्षेत्रात पाऊल टाकण्यास उत्सुक आहे. जुगाड मोशन पिक्चर्स नावाची त्याची निर्मिती संस्था असून मित्रासोबत भागीदारी करून त्याने ही संस्था सुरु केली आहे. संजय दत्तची मुलगी त्रिशलाला अभिनय करायचा नाही. तिला वकिली करण्यात रस असून भविष्यात क्रिमिनल लॉयर बनण्याचं तिचं ध्येय आहे. त्रिशला न्यूयॉर्कमध्ये शिक्षण घेते आहे. आमीर खानची मुलगी आयरा खान सध्या सहाय्यक दिग्दर्शकाची भूमिका वठवते आहे. आयराला अभिनयापेक्षा दिग्दर्शनात रस आहे. जॅकी श्रॉफची मुलगी कृष्णा सोशल मीडियावर सक्रीय असते. तिचे फोटो चर्चेचा विषय ठरतात. कृष्णाचा भाऊ टायगर अभिनेता असला तरी तिला अभिनय करायचा नाही. कृष्णा लघुपट आणि माहितीपट तयार करते. कृष्णाने सहाय्यक दिग्दर्शक म्हणूनही काम केलं आहे. वरूण धवनचा मोठा भाऊ रोहित धवनला दिग्दर्शनात रस आहे. त्याने काही चित्रपटांचं दिग्दर्शन केलं आहे. अर्जुन कपूरची बहीण अंशुला चित्रपटाशी संबंधित नाही. ती सध्या गूगलसोबत जाहिरातींवर काम करते आहे. ती सामाजिक कार्यातही आघाडीवर असते. आलिया भट्टची बहीण शाहीन भट्टलाही अभिनय करायचा नाही. तिला लेखनात रस आहे. तिचं एक पुस्तकही प्रकाशित झालं आहे.




# आता येणार सहावा हंगाम

**'कोण होणार करोडपती'च्या सहाव्या हंगामाची चर्चा सुरू झाली असून या कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी पुन्हा एकदा सचिन खेडेकर यांच्याकडे देण्यात आली आहे. कोण होणार करोडपतीच्या सहाव्या हंगामात बरंच काही नवं पहायला मिळणार आहे.**

अमिताभ बच्चन यांच्या 'कौन बनेगा करोडपती'प्रमाणेच मराठीतल्या कोण होणार करोडपतीला प्रचंड लोकप्रियता मिळाली. सचिन खेडेकर यांनी पहिल्या दोन हंगामाचं सूत्रसंचालन केलं. त्यानंतर तिसऱ्या हंगामची जबाबदारी स्वप्नील जोशीकडे देण्यात आली. चौथ्या हंगामात नागराज मंजुळे सूत्रसंचालकाच्या भूमिकेत दिसले. त्यानंतर पाचव्या हंगामात पुन्हा सचिन खेडेकरांना पाचारण करण्यात आलं. २०२१ मध्ये हा हंगाम पार पडल्यानंतर आता सहाव्या हंगामाची चर्चा सुरू झाली आहे. सहाव्या हंगामाचं सूत्रसंचालनही सचिन खेडेकर करणार आहेत. सहाव्या हंगामासाठी वेगळा सेट तयार करण्यात येणार आहे. हा सेट आधीपेक्षा थोडा मोठा आणि आलिशान असेल. इतकंच नाही तर सेटचा लूकही बदलण्यात येणार असल्याचं कळतंय. गेल्या वर्षी एप्रिल महिन्यात पाचव्या हंगामाची सुरूवात झाली होती आणि साधारण सहा महिने हा कार्यक्रम सुरू ठेवण्यात आला होता. यंदाही एप्रिलमध्ये सहाव्या हंगामाची सुरूवात करण्यात येणार असून तो सहा महिने सुरू राहणार आहे. त्यामुळे प्रेक्षकांना ज्ञान वाढवण्याची आणि पैसे जिंकण्याची नवी संधी मिळणार आहे.



# आलियाची स्वप्नपूर्ती

सध्या 'गंगूबाई काठियावाडी' हा चित्रपट अनेक कारणांमुळे चर्चेत आहे. या चित्रपटात आलिया भट्टने गंगूबाईची भूमिका केली असून तिच्या लूकचं चांगलंच कौतुक होत आहे. गंगूबाई काठियावाडीच्या निमित्ताने संजय लीला भन्साळीसोबत काम करण्याचं आलियाचं स्वप्न पूर्ण झालं आहे. आपल्याला संजयसोबत काम करायचं होतं आणि या चित्रपटामुळे ही संधी मिळाल्याचं आलियाने म्हटलं आहे. गंगूबाईसारखी भूमिका करायला मिळणं ही माझ्यासाठी मोठी गोष्ट असल्याचंही तिने म्हटलं आहे.

# भन्नाट युनिसायकल हॉकी

फन टाईम

दोस्तांनो, जगभरात विविध प्रकारच्या स्पर्धा होत असतात. त्यात एखादा पदार्थ खाण्याची स्पर्धाही असते. अशीच एक स्पर्धा म्हणजे 'हॉटडॉग इटिंग कॉन्टेस्ट'. हॉटडॉग हा बर्गरसारखा पदार्थ आहे. अमेरिकेसह युरोपातल्या देशांमध्ये हॉटडॉग खूप प्रसिद्धही आहे. हॉटडॉगच्या चाहत्यांची संख्या बघता या स्पर्धेचं आयोजन केलं जातं. यात स्पर्धकाला दहा मिनिटात जास्तीत जास्त हॉटडॉग खायचे असतात. अमेरिकेत अशा प्रकारच्या स्पर्धांच्या आयोजनाला सुरूवात झाली. नाथन्स 'हॉटडॉग इटिंग कॉन्टेस्ट'मुळे हा प्रकार खूपच लोकप्रिय झाला. ही स्पर्धा दरवर्षी चार जुलैला आयोजित केली जाते. अमेरिकेसह, कॅनडा आणि जपानमध्येही अशा स्पर्धा आयोजित केल्या जातात.

हॉकी हा खेळ विविध प्रकारे खेळला जातो. 'आईस हॉकी', 'अंडरवॉटर हॉकी' असे प्रकारही लोकप्रिय आहेत. 'युनिसायकल हॉकी' हा खेळ अनेक ठिकाणी खेळला जातो. या हॉकीमध्ये खेळाडूंना युनिसायकल चालवत हा खेळ खेळायचा असतो. हॉकी खेळाताना युनिसायकलवरचा पाय काढण्याची परवानगी खेळाडूंना नसते. त्यामुळे स्वत:चा तोल सांभाळात हॉकी स्टीकने चेंडू गोलजाळ्यात टाकण्याची कसरत त्यांना करावी लागते. या हॉकीत दोन संघ एकमेकांसमोर उभे ठाकतात. प्रत्येक संघात पाच खेळाडू असतात. प्रत्येक खेळाडूला युनिसायकल वापरावी लागते. यात गोलकिपर नसतो. संघातला एखादा खेळाडू मागे राहून गोलकिपरची भूमिका पार पाडतो. इंटरनॅशनल युनिसायकलिंग फेडरेशनतर्फे या स्पर्धांचं आयोजन केलं जातं. ऑस्ट्रेलिया, जर्मनी आणि स्वीत्झर्लंडमध्ये युनिसायकल हॉकीच्या राष्ट्रीय स्पर्धा आयोजित केल्या जातात.



# निसर्गसंपन्न गॅबॉन

सफर देशांची

'गॅबॉन' किंवा 'गॅबनिज रिपब्लिक' हा आफ्रिका खंडातला विषुववृत्तावरचा देश आहे. कॅमेरुन, कांगो हे गॅबॉनचे शेजारी. 'लिब्रेव्हिले' ही गॅबॉनची राजधानी आणि सर्वात मोठं शहरही. २,७०,००० चौरस किलोमीटर परिसरात पसरलेल्या गॅबॉनची लोकसंख्या दीड कोटींच्या आसपास आहे. स्वातंत्र्याआधी गॅबॉन ही फ्रान्सची वसाहत होती. १७ ऑगस्ट १९६० या दिवशी त्यांना स्वातंत्र्य मिळालं. सुरूवातीला या देशात फक्त एकाच पक्षाची सत्ता होती. मात्र १९९० नंतर इथे आघाडीचं सरकार आलं.




सब साहारन आफ्रिकेतल्या श्रीमंत देशांमध्ये गॅबॉनची गणना होते. हा देश मध्य आफ्रिकेतल्या अटलांटिक किनाऱ्यावर आहे. हा देश विषुववृत्तावर असल्याने इथलं हवामानही विषुववृत्तीय असतं. देशाचा ८५ टक्के भाग जंगलांनी व्यापला आहे. त्यामुळे इथे पक्ष्यांच्या ७७७ प्रजाती सुखाने नांदत आहेत. 'ऑग्यू' ही गॅबॉनमधली सर्वात मोठी नदी. १२०० किलोमीटर लांब असलेली ही नदी पाण्याचा मुख्य स्रोत आहे. या देशावर फ्रेंचांनी राज्य केल्यामुळे फ्रेंच इथली अधिकृत भाषा आहे.

या देशात मँगनीज, युरेनियम, फॉस्फेट, लोह, नैसर्गिक वायू, सोनं, हिरे अशी नैसर्गिक साधनसंपत्ती सापडते. गॅबॉनला प्राचीन संस्कृती असून सांस्कृतिक दृष्ट्या हा देश समृद्ध आहे. पौराणिक कथा आणि लोककथांचं भांडार या देशात आहे. मास्क तयार करणं आणि चेहरा रंगवणं हे इथल्या संस्कृतीचं एक प्रतिक आहे.



# पर्यावरणप्रेमी तरंगी

छोटे उस्ताद

छोट्या स्कुबा डायव्हिंग हा एक धाडसी खेळ. खरं तर स्कुबा डायव्हिंग खूप रंजक आहे. स्कुबा डायव्हिंगच्या माध्यमातून तुम्ही समुद्राखालचं जग अनुभवू शकता. रंगीबेरंगी मासे, समुद्री वनस्पती तसंच अन्य सागरी जीव न्याहाळू शकता. स्कुबा डायव्हिंग हा एक भन्नाट अनुभव ठरू शकतो. तुम्ही एकदा तरी हा अनुभव घ्यायला हवा. चेन्नईच्या तरंगी अराथानाला स्कुबा डायव्हिंगची प्रचंड आवड. तरंगी अवघ्या आठ वर्षांची आहे. पाच वर्षांची असल्यापासून ती स्कुबा डायव्हिंग करते. तरंगीचे वडील अरविंद स्कुबा डायव्हिंगचे प्रशिक्षक आहेत. त्यांच्यामुळे तरंगीलाही स्कुबा डायव्हिंग आवडू लागलं. अरविंद यांनीही तरंगीला खूप प्रोत्साहन दिलं. तरंगीला सागरी जीवनाचं आकर्षण आहे. वाढत्या प्रदूषणामुळे सागरी जीवन धोक्यात आल्याची जाणीव तिला आहे आणि सागरी जीवन टिकवून ठेवण्यासाठी ती प्रयत्नही करत असते. तरंगी स्कुबा डायव्हिंग तर करतेच शिवाय ती समुद्र तसंच समुद्रकिनारे स्वच्छ करण्याचं कामही करते. तरंगी वडिलांसह सागरी प्रदूषण कमी करण्यासाठी झटते आहे. तरंगी आणि तिच्या वडिलांनी मिळून आत्तापर्यंत जवळपास ६०० किलो प्लास्टिकच्या बाटल्या गोळा केल्या आहेत. या बाटल्यांचं रिसायकलिंग केलं जातं.

समुद्र तसंच समुद्रकिनाऱ्यांच्या स्वच्छता मोहिमा राबवल्याने आपल्याला खूप समाधान मिळत असल्याचं सारंगी सांगते. तरंगी एवढ्यावरच थांबलेली नाही. ती नष्ट होणाऱ्या सागरी प्रजातींचं संरक्षण करण्याबाबतही जागरूकता निर्माण करते आहे. प्रदूषण तसंच अन्य कारणांमुळे समुद्रातले अनेक जीव नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्यांचं अस्तित्व टिकवण्याचं महत्त्व तरंगी पटवून देते. सारंगीला मोठेपणी स्कुबा डायव्हिंग प्रशिक्षक व्हायचं आहे.

# धम्माल मोबाईल गेम्स


स्मार्ट टेक

दोस्तांनो, भारताने चीनला पुन्हा एकदा दणका दिला आहे. भारत सरकारने ५४ चीनी ॲप्सवर बंदी घातली असून यात फ्री फायर या गेमिंग ॲपचाही समावेश आहे. आधी पबजी आणि आता फ्री फायरवर बंदी आल्यामुळे मोबाईलवर गेम खेळणाऱ्यांची चांगलीच पंचाईत झाली आहे. मुलांनो, मोबाईलवर थोडा वेळ गेम खेळायला हरकत नाही. पण मोबाईल सतत हातात घेऊन बसणं चुकीचं आहे. फ्री फायरवर बंदी आली असली तरी त्याच पद्धतीचे अन्य गेम्सही आहेत. चला तर मग फ्री फायरला टक्कर देणाऱ्या अशाच काही मोबाईल गेम्सवर नजर टाकू या.

✻ कॉल ऑन ड्युटी हा मोबाईल गेम खूप प्रसिद्ध आहे. अनेकांनी हा गेम डाउनलोड केला आहे. कॉल ऑन ड्युटी हा मल्टीप्लेअर गेम असून याची भन्नाट फीचर्स अनेकांना भावतात. यात १०० बॅटल मोड आहेत. तसंच वेगवेगळे मल्टीप्लेअर मोडही आहेत.

✻ नाईव्हज आउट हा सुद्धा चांगला गेम आहे. यात पबजी गेमसारखे नियम आहेत. या गेमच्या एका टीममध्ये पाच मेंबर असतात. यातही वेगवेगळे मोड्स मिळतात.

✻ होपलेस बॅटलग्राउंड फाईट हा फ्री फायरसारखाच गेम असून या गेममध्ये एकावेळी १२१ खेळाडू खेळू शकतात. हा गेमही खूप मस्त आहे.



दोस्त हे मस्त

## कमी वेळ झोपणारे जिराफ



छोट्यांनो, जिराफ खूप उंच असतो. पण तो खूप कमी वेळ झोपतो. हा प्राणी दिवसभरात फक्त अर्धा तास झोपतो. जिराफ जंगलात राहणारा आकाराने मोठा प्राणी आहे. वाघ, सिंह अशा प्राण्यांना तो अगदी सहज दिसू शकतो. त्यामुळे सुरक्षित झोप घेणं त्याला शक्य नसतं. त्यामुळे ते खूप कमी झोपतात. अधून मधून एखादी डुलकी घेतात. बरेचदा उभ्यानेच झोपतात.

खादाडी

## चिजी बिस्किट बाईट्स

संध्याकाळी तुम्ही चीजी बिस्किट बॉल्स बनवू शकता. यासाठी १२ ते १६ मॉनॅको बिस्किट्स घ्या. २ चमचे मैदा, बटर,पाव कप चिरलेली भोपळी मिरची, दोन चमचे स्वीट कॉर्न, पाव कप दूध, टोमॅटो सॉस, चिली सॉस, मीठ, चिरलेली कोथिंबिर आणि शेव हे पदार्थ घ्या.



एका कढईत बटर गरम करा. त्यात मैदा घालून हलवून घ्या. त्यात भोपळी मिरची आणि कॉर्न घालून शिजवून घ्या. यात दूध घालून तीन ते चार मिनिटं शिजवून घ्या. टोमॅटो सॉस, चिली सॉस आणि मीठ घाला. थंड झाल्यावर याचे छोटे गोळे बनवा. एक मोनॅको बिस्किट घ्या. यावर त्यावर हा गोळा ठेवा. दुसरं बिस्किट त्यावर ठेऊन हळूच दाब द्या. अशाच प्रकारे बिस्किटांमध्ये मिश्रण भरून घ्या. वरून शेव घाला. सॉससोबत खा.

स्कूल टाईम

## शिक्षकांना समजून घ्या...

दोस्तांनो, कधीकधी शाळेतले शिक्षक तुम्हाला ओरडतात. पण यावरून तुम्ही त्यांच्याबद्दल चुकीचं मत बनवू नका. शिक्षक कडक आहेत असं म्हणू नका. कारण बरेचदा एखाद्या घटनेमुळे ते चिडलेले असू शकतात. हा राग शाळेतल्या मुलांवर निघतो. बरेचदा मुलांना शिस्त लावण्यासाठी ते असं करतात. त्यामुळे शिक्षक ओरडले तरी त्यांची बाजू समजून घ्या.



योगा टाईम

## असं आहे गोमुखासन



गोमुखासन म्हणजे गायीचं तोंडासारखं आसन. सकाळी उठल्यावर रिकाम्या पोटी हे आसन करा. साधारण ३० ते ६० सेकंद याच स्थितीत राहा. या आसनामुळे नैराश्य कमी होतं. खूप ताजंतवानं वाटतं. परीक्षेच्या दिवसातला ताण या आसनामुळे दूर होईल.

## हरि-हराचा वाद मिटवणारे

# श्रीसंत शिरोमणी नरहरी सोनार

**वारकरी संप्रदायातील प्रथम शैवपंथी, हरि-हराचा वाद मिटवण्यासाठी आयुष्यभर झटणारे आणि शिव उपासक असून, जीवन विठ्ठलमय करणारे संत नरहरी सोनार यांची शनिवार, दि. १९ फेब्रुवारी रोजी ७३६वी पुण्यतिथी. त्यानिमित्त हा लेखप्रपंच...**

हेमकांत सोनार

एकदा शिव आणि विठ्ठल एकच आहेत असा त्यांना साक्षात्कार झाला आणि त्यांनी आपला जीवनमार्ग विठ्ठलमय करून टाकला. रामचंद्र-कृष्णदास-हरिप्रसाद-मुकुंदराज-मुरारी-अच्युत आणि नरहरी-नारायण अशी त्यांची वंशपरंपरा सांगण्यात येते. त्यांचा जन्म श्रावण शुक्ल १३ ला इ.स. ११९३ शके १११५ च्या आसपास पंढरपूर येथे झाला. (महाराजांची जन्मदिनांक निश्चित सांगता येणार नाही.)

संत नरहरी महाराज यांच्या पत्नीचे नाव गंगा व मुलांची नावे नारायण व मालू अशी होती. नरहरी महाराजांच्या घराण्याचे मूळ पुरुष रामचंद्र सदाशिव सोनार होते, असे म्हटले जाते. संत नरहरी सोनार यांचे मूळ आडनाव महामुनी होते. संत नरहरी सोनार हे वडिलोपार्जित सुवर्णकाम करीत असल्याने त्यांचे आडनाव पुढे सोनार झाले, असे सांगितले जाते. हा मुलगा हरि (विठ्ठल) व हराचा (शंकर) समन्वय साधणारा थोर संत होईल. याला दीर्घायुष्य प्राप्त होईल. तो शिवभक्त असला, तरी विठ्ठलाचा भक्त म्हणून त्रिखंडात प्रसिद्ध होईल, असा आशीर्वाद चांगदेव महाराजांनीच संत नरहरी सोनार यांना दिला होता.

पंढरपूरमधील संत नरहरी सोनार यांनी आपल्या भक्तीचा ठसा महाराष्ट्रभर उमटविला. संत नरहरी सोनार यांचा व्यवसाय दागिने बनवण्याचा होता. त्यांची कलाकुसर त्यावेळेस चांगलीच प्रसिद्ध होती. नरहरी सोनार प्रसिद्ध शिवभक्त होते. त्यांच्या घरात शिवभक्ती परंपरेने चालत आली होती. त्यांच्या या भक्तीची चर्चा पंढरपुरामध्ये मोठ्या प्रमाणावर होती. रोज सकाळी उठल्यावर ते शिव-आराधना करीत असत, ज्योतिर्लिंगावर बेलपत्र वाहिल्याशिवाय कोणत्याही कामाला हात लावत नसत. कट्टर शिवभक्त असल्याने दुसऱ्या देवावर त्यांची विशेष श्रद्धा नव्हती.

एकदा एका विठ्ठलभक्त सावकारासाठी नरहरी यांनी सोन्याची साखळी बनवली. विठ्ठलाच्या कमरेला सोनसाखळी घातली. मात्र, ती एक वीत जास्त झाली. सावकाराने आपल्या सेवकाला नरहरी सोनार याच्याकडे पाठविले व साखळीचे माप बरोबर करून आणण्यास सागितले. नरहरी सोनार यांनी साखळीचे माप त्याप्रमाणे करून दिले. दुरुस्त करून दिलेली साखळी विठ्ठलाला अर्पण केल्यावर ते माप पुन्हा एकदा जास्त झाल्याचे दिसून आले. या प्रसंगामुळे नरहरी सोनार चांगलेच गोंधळून गेले. माप बरोबर देऊनही असे का होतेय, या विचाराने त्यांना ग्रासून टाकले. अखेर स्वतः मंदिरात जाऊन माप घेण्याचा निर्णय त्यांनी घेतला. मात्र, मंदिरात प्रवेश करताना त्यांनी स्वतःच्या डोळ्यावर पट्टी बांधली आणि विठ्ठलाच्या मूर्तीसमोर गेले. सोनसाखळी विठ्ठलाच्या कमरेला बांधत असताना, त्यांच्या हाताला व्याघ्र चर्मे लागली. नरहरी सोनार यांचे हात गळ्यापर्यंत गेले असता, त्यांना शेष नाग असल्याचे जाणवले. नरहरी सोनारांनी लगेच आपल्या डोळ्यावरील पट्टी काढली. बघतात तर काय समोर विठ्ठलच होता. नरहरी सोनार यांनी पुन्हा एकदा डोळ्यावर पट्टी बांधली परत पुन्हा तोच प्रकार घडला. अखेर प्रत्यक्ष परमेश्‍वराने त्यांना दर्शन देऊन सांगितले की, पांडुरंग परमात्मा शंकर भगवान आहे. शिव आणि विष्णू भिन्न नाहीतें एकच आहेत, हे सर्व देव विठ्ठलातच सामावलेले आहेत.

हरि-हर यांच्या साक्षात्कारानंतर नरहरींचे लक्ष व्यवसायाकडे कमी व भक्तीमार्गाकडे अधिक झाले. अन्य संताच्या सहवासात त्यांना आनंद मिळू लागला. अभंग रचनेसाठी त्यांनी बराच काळ घालवला. संसार करता-करता परमार्थ साधता येतो, हे नरहरींनी फार मार्मिकपणे सांगितले. ब्रह्म हे सगुण आहे की निर्गुण? क्षर आहे की अक्षर? याविषयी एखाद्या तत्त्ववेत्त्याप्रमाणे सोनाराचा व्यवसाय करणारे नरहरी महाराज सहजपणे ब्रह्मतत्त्वाची व्याख्या सांगून जातात.

नरहरी महाराजांचे संसारासंबंधी पूर्णपणे अनासक्ती आलेली होती. ते ब्रह्मस्थितीला प्राप्त झालेले होते. नरहरी महाराजांचा हा ज्ञानदीप आता वैकुंठाच्या मार्गावर प्रज्ज्वलित झाला होता. ते गुणगुणत होते. आपल्या गावातरी न्या हो, द्या मला भेट द्या हो. तेव्हा देवालाही भक्ताची चिंता लागली व दया आली.



अशा प्रकारे माघ वद्य तृतीयेला नरहरींनी आपल्या मल्लिकार्जुन देवाला नमन केले आणि पत्नीचा, मुला-सुनांचा, नातवांचा अंतिम निरोप घेतला. आपल्या पारंपरिक निवासस्थानाला वंदन केले. या महापुरुषाच्या अंगामध्ये भक्तीभावाचा ईश्‍वरीशक्तीचा भावेश संचारला होता. विठ्ठलाला त्यांनी हाताचा विळखा घातला आणि आश्चर्य घडले. देवाच्या कटीमध्ये हा भक्तराज विलीन झाला. नरहरि महाराजांनी विठ्ठलाचे ठायी आत्मसमर्पण केले. नामा म्हणे नरहरी सोनार झाला अलंकार देवाचा हा!

संत नरहरी महाराज यांची समाधी पंढरपूर येथे विठ्ठल मंदिरासमोर महाद्वारात मल्लीकार्जुन मंदिराशेजारी आहे. सर्वात वयोवृध्द संत म्हणून संत नरहरी महाराजांना पाहिले जाते. अंतसमयी ते ९२ वर्षांचे होते, असे जाणकारांच्या मते सांगितले जाते. आज संत नरहरी सोनार महाराज यांच्या ७३६व्या पुण्यतिथीनिमित्ताने त्यांच्या चरणी माथा!

# श्रीपंत सांप्रदायाची ६३ वर्षे

*रायगड जिल्हा श्रीपंत सांप्रदायाला आज ६३ वर्ष पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने रायगड जिल्हा श्रीपंत सांप्रदायाच्या ६२ वर्षातील वाटचालीचा मागोवा.*

*१९०५ साली अवधूतयोगी श्रीपंत महाराज बाळेकुंद्री यांच्या निर्वाणानंतर श्रीपंत सांप्रदायाच्या शाखा कर्नाटकासह, महाराष्ट्र व मध्यप्रदेशापर्यत विस्तारत गेल्या. आपल्या रायगड जिल्ह्यात श्रीपंत सांप्रदायाची मुहूर्तमेढ बोधस्वरूप सद्गुरू साबाजीदादा शेडगे व गुरूवर्य सुभानराव तथा अण्णा राणे या गुरूशिष्य जोडीने केली. यासाठी गुरूवर्य सुभानराव तथा अण्णा राणे यांच्या पत्नी प्रेमळ सुनंदाताई राणे यांची देखील मोलाची साथ लाभली. तो दिवस होता १९ फेब्रुवारी १९५९ गुरूवर्य अण्णा व प्रेमळ सुनंदाताई यांच्या पोटी पुत्ररत्नाचा जन्म झाला. वार गुरूवार असल्याने व श्रीपंत महाराजांप्रती दृढ भक्ती असलेल्या अण्णांनी दत्तात्रेय असे मुलाचे नाव ठेवले. याच दिवशी बोधस्वरूप सद्गुरू साबाजीदादांच्या उपस्थितीत गुरूवर्य अण्णांनी रायगड जिल्हा श्रीपंत सांप्रदायाची व श्रीपंत भक्त मंडळ पेझारीची स्थापना केली. त्याला आज ६३ वर्ष पूर्ण होत आहेत.*

*११९६० पासून दरवर्षी १९ फेब्रुवारी हा दिवस रायगड जिल्हा श्रीपंत सांप्रदायाचा वर्धापनदिन म्हणून साजरा होण्यास सुरुवात झाली. तेव्हापासून आजपर्यंत १९ फेब्रुवारी हा दिवस रायगड जिल्हा श्रीपंत सांप्रदायाचा वर्धापनदिन म्हणून रायगड जिल्ह्यात साजरा केला जातो. त्यानिमित्ताने पंतभक्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करतात. या रायगड जिल्हा श्रीपंत सांप्रदायाने मागील ६२ वर्षात अखिल श्रीपंत सांप्रदायाच्या नकाशावर आपले एक पक्के स्थान निर्माण केले आहे.*



आदित्य कडू

*साबाजीदादा शेडगे, गुरुवर्य अण्णा राणे व शिवाप्पा महाराज सत्पाळ या त्रिमूर्तीने रायगड जिल्ह्यात श्रीपंत महाराजांच्या सदगुरू भक्ती, बंधुप्रीती आणि आत्मशांती या त्रिसूत्रीचे महत्त्व लोकांना पटवून दिले. श्रीपंत भक्ती म्हणजेच दत्तभक्ती का महत्वाची आहे हे सांगितले. श्रीपंत सांप्रदायाच्या ६२ वर्षाच्या वाटचालीत सदगुरू साबाजीदादा शेडगे आणि गुरुवर्य अण्णा राणे यांच्या निर्वाणानंतर त्यांचा असंख्य शिष्यांनी आणि भक्तांनी सांप्रदायाच्या विस्तारात महत्वपूर्ण भूमिका बजावली. विशेष म्हणजे खालापूर तालुक्यातील गोहे व छत्तीसी विभागात श्रीपंत सांप्रदाय स्व. मोरेश्वर उर्फ बापू घारे यांनी पोहोचवला. श्रीदत्तजयंती, गुरुपौर्णिमा, पंतजन्माष्टमी, गोहे येथील श्रीपंत पादुका स्थापनेचा वर्धापनदिन उत्सव, साबाजीदादा शेडगे यांची पुण्यतिथी, अण्णा राणे यांची पुण्यतिथी, वाघोडे येथील अवधूत मठीतून निघणारी प्रेमध्वज फेरी, सुनंदाताई राणे यांची पुण्यतिथी, असे अनेक उत्सव होत असतात. देशाचार, कुलाचार, वर्णाश्रम, धर्म बिनचूक चालवित जावे या श्रीपंत महाराजांनी भक्तांसाठी घालून दिलेल्या दुसऱ्या नियमानुसार रायगड जिल्ह्यात श्रीपंत सांप्रदायाच्या जिथे जिथे शाखा आहेत तिथे तिथे सामाजिक कार्य केले जाते. मागील २४ वर्ष रायगडचे भाग्यविधाते स्व. प्रभाकर पाटील (भाऊ) यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करते. २३ जानेवारी २०२३ रोजी या रक्तदान शिबिराचा रौप्यमहोत्सव साजरा करणार आहे.*

*श्रीपंत महाराजांचा अवधूत सांप्रदायाची ६२ वर्षांपूर्वी ज्यांनी रायगडात मुहूर्तमेढ रोवली त्या बोधस्वरूप सद्गुरू साबाजीदादा शेडगे, गुरुवर्य अण्णा राणे यांना अभिवादन करून श्रीपंत महाराजांचे अखंड आशीर्वाद सदैव रायगड जिल्हा श्रीपंत सांप्रदायावर राहोत, हीच प्रार्थना करून हा लेख समाप्त करतो.*

*|| श्री गुरुदेव दत्त ||*

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-21 (31-12-2022)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : इब्राहीम अफगाण* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(✻ या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)